बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.२९ एप्रिल २०२५ |वर्षे४थे| अंक२५७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# भारतात जगातील पहिली रोबोटिक शस्त्रक्रिया

## गौरवास्पदःभारती विद्यापीठात पार पडली शस्त्रक्रिया

अनिल चौधरी पुणे

पुणे:दात हा आपल्या शरीरातील महत्वाचा भाग आहे. तर दातातदुखले तर ते सरळ मेंदूशी निगडीत असते. त्यामुळे दाताची शस्त्रक्रिया फार सावध पद्धतीने करावी लागते. मात्र आता दंतशस्त्रक्रिया करण्यासाठी रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर सुरु करण्यात आला आहे. पुण्यातील भारती विद्यापीठ दंत महाविद्यालयाने फ्रान्समधील लुपिन डेंटलच्या सहकार्याने रोबोटिक हातांचा वापर करून व्हीनियर्सवरील क्लिनिकल चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाली. हा एक अभूतपूर्व प्रकल्प दंतचिकित्सा क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा असून जगातील पहिली दंतशस्त्रक्रिया भारती हॉस्पिटलमध्ये पार पडली असल्याची माहिती भारती विद्यापीठ मेडिकल फाउंडेशनच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप यांनी दिली.

दातांच्या रुग्णांची काळजी आणि उपचारांचे परिणाम वाढविण्यात रोबोटिक तंत्रज्ञानाची क्षमता या तंत्रज्ञामुळे वाढली गेली आहे. यानिमित्ताने आज दंतशास्त्राने मोठी झेप घेतली आहे. लेसरपासून मायक्रोस्कोप, कॅड कॅम, स्कॅनर अशी अत्याधुनिक साधने, उपचार उपलब्ध आहेत. दात काढणे, बसवणे इतकेच नाही, तर वेडेवाकडे दात सरळ करणे, हिरड्यांचे विविध आजार बरे करणे, जीभ, पडजीभ, ओठ, गाल यांच्या आरोग्याबाबत भारती हॉस्पिटलमध्ये उपचार होत आहेत यातच या तंत्रज्ञानाचा फायदा सर्वसामान्य रुग्णाला होणार असल्याचे भारती विद्यापीठ दंत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. राजेश क्षीरसागर म्हणाले.

डॉ. राजेश क्षीरसागर पुढे म्हणाले की, हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल आम्हाला खूप आनंद होत आहे. फ्रान्समधील लुपिन डेंटलसोबतच्या सहकार्याने केवळ दंत रोबोटिक्समधील आमची तज्ज्ञता वाढवली नाही तर आमच्या संस्थेला नाविन्यपूर्ण दंत शिक्षण आणि संशोधनात आघाडीवर स्थान दिले आहे.

संचालक, डॉ. संजय लोंढे म्हणाले की, ही कामगिरी आमच्या प्राध्यापकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या समर्पणाचे आणि कठोर परिश्रमाचे प्रतीक आहे. आम्ही दंत रोबोटिक्समध्ये पुढील संधी शोधण्यास आणि दंत काळजीच्या प्रगतीत योगदान देण्यास उत्सुक आहोत.प्रमुख निरीक्षक, डॉ. विजयसिंह मोरे म्हणाले की, रोबोटिक हातांचा वापर करून व्हेनियरवरील क्लिनिकल चाचणीला प्रचंड यश मिळाले आहे. या प्रयत्नात भागीदारी आणि पाठिंब्याबद्दल आम्ही फ्रान्समधील ल्युपिन डेंटलचे आभारी आहोत.भारती विद्यापीठ आरोग्य विज्ञान पान २ वर



# सर्वोच्च न्यायालयाला निवडणूक थांबविण्याचा अधिकारच नाही!!



न्यायालयात भूमिका मांडणे गरजेचे पण...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी

प्रत्युत्तरावर प्रकाश आंबेडकरांनी भूमिका मांडली

## प्रकाश आंबेडकर यांनी डागली तोफ

पुण्यभूमी प्रतिनिधी

अकोला:राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत पहिल्यांदा न्यायालयात भूमिका मांडणे गरजेचे आहे, कुठल्याही निवडणूक थांबवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला नाही, यात दुर्दैव असे आहे की, निवडणूक आयोगाला कणा नाही, ते निवडणूक घेण्यासाठी आहे. संविधानाने सरळ सांगितलेले आहे की, सर्वोच्च न्यायालयाला अधिकार नाही, त्यांनी हिम्मत दाखवून निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला पाहिजे असे वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. गेल्या तीन वर्षांपासून स्थानिकच्या निवडणुका पुढे पान २ वर

### तुम्ही ॲक्शन घ्या...

मुंबई असणा–या लोकांनी, ज्यांना ज्यांना वाटते सरकारने कारवाई करायला पाहिजे, तिथे सर्वांनी उपस्थित रहावे. एका आवजात आम्ही तुमच्या सोबत आहोत, तिजोरीत पैसे नसतील तर सुद्धा आम्ही द्यायला तयार आहोत. तुम्ही ॲक्शन घ्या. कच खाऊ नका, हे सांगण्यासाठी दोन तारखेला एकत्र जमणार आहोत आणि सरकारला भाग पाडणार आहोत, असे आम्ही एकत्र येणार आहोत असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

### मुंबईत एकत्र जमणार

एकंदरीत असे दिसते आहे की मिलिटरी ॲक्शन घ्यायला तयार आहे, पण राजकीय नेतृत्व जे आहे, ते निर्णय घ्यायला तयार नाही. सरकारने निर्णायक निर्णय घ्यावा म्हणून, मुंबईतील हुतात्मा स्मारकासमोर दोन मे रोजी तीन वाजता एकत्रित जमणार आहोत, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.

# वाळू चोरट्यांवर थेट कारवाई

## दणका:गोदावरी पात्रातून जप्त केले वाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा:वाळू ची गोदावरी पात्रातून अवैध तस्करी करत असलेल्या एका वाहनावर सिरसाळा पोलिसांनी कार्यवाही केली आहे. अवैधरीत्या गोदावरी पात्रातून वाळू उपसा करून वाळूची तस्करी करणाऱ्या एका वाहनावर सिरसाळा पोलिसांनी दि. २५ रोजी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केली असुन या कारवाईत तीन लाखाचे वाहन व बारा हजार रुपयांची वाळू पोलिसांनी जप्त केली आहे.



याबाबत पोलीस प्राप्त माहितीनुसार, यातील आरोपी बालाजी सुदाम मोठे रा. केकरजवळा ता. मानवत जि. परभणी हा मौजे तेलसमुख ता. परळी जि. बीड येथील नदीपात्रात टाटा १६१३ टर्बो कंपनीचा टिप्पर द्वारे बेकायदेशिर रित्या, विनापरवाना अवैध वाळु भरुन त्याची चोरटी विक्री करण्यासाठी चोरुन घेवुन जात असताना पोलीसांनी कारवाई केली.पोलीसांना पाहुन आरोपी त्याच्या ताब्यातील टिप्पर जागीच सोडुन पळुन गेला. या कारवाईत पोलीसांनी ३,००,००० रु. किंमतीचे एक टाटा १६१३ टर्बो कंपनीचा टिप्पर व टिप्परचे ट्रॉलीमध्ये अंदाजे ०२ ब्रास वाळु भरलेली प्रति ब्रास किं. पान २ वर

# शेतातल्या गोठ्याला लागली आग

## दुर्घटना:एका गाईसह जीवनावश्यक वस्तू जळून खाक

पुण्यभूमी प्रतिनिधी

केजःतालुक्यातील बनकरांजा शिवारातील असणाऱ्या शेतातील कोठ्यास अचानक लागलेल्या आगीत एका गाईसह जीवनावश्यक वस्तू जळून भस्मसात झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,अमोल दिनकर थोरात रा.बनकरांजा यांचे बनकरांजा शिवारातील शेतात



अचानक लागलेल्या आगीत कोठ्यामध्ये असणारी जिवंत गाय( व्याहला झालेली) तसेच स्प्रिंकलर सट,अंदाजे पाच पान २ वर

# केज कार्यालयाचा भोंगळ कारभार?

## बोंबला:वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील केज पंचायत समिती मध्ये असलेल्या जिल्हा परिषद बांधकाम विभाग केज कार्यालयाचा भोंगळ कारभार सुरू असलेल्यांचे समजले जाते आहे कारण अधिकारी कर्मचारी मनमानी कारभारा नुसार वागत आहेत वेळेचे बंधन राहीलेले नाही तसेच कामामध्ये लाचलुचपत करण्यात येत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे त्यामुळे अधिकारी, कर्मचारी यांनी असे वागणे बरे नव्हे कारण वेळेचे बंधन राहणे गरजेचे आहे कारण एखाद्या अधिकाऱ्यांची सही पान २ वर

# परळीत कॉँग्रेसचा सद्भावना संकल्प

## राहुल सोनवणे:नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक १ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश कॉँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित केला आहे. कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली



होणाऱ्या या सत्याग्रहात कॉँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह कॉँग्रेसचे नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे. या सद्भावना संकल्प सत्याग्रहाच्या पान २ वर

# कळंबमध्ये निघाला कॅण्डल मार्च

## ऋणानुबंध:पहलगाम हल्लयातील नागरिकांना आदरांजली

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:दक्षिण काश्मीरमधील पहेलगाम येथे २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या केलेल्या भ्याड हल्लयात पर्यटनासाठी गेलेल्या २८ नागरिकांचा मृत्यू झाला आहे या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महासंघ कळंब व सकल कळंबकर नागरिकांनी दिनांक २७ एप्रिल रोजी संध्याकाळी ७.०० वाजता कळंब शहरातून




कॅन्डल मार्च काढला यावेळी अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्लयाचा निषेध व्यक्त करण्यात आला व घोषणा देण्यात आल्या या मार्च मध्ये सर्वधर्मीय नागरिकांचा सहभाग होता कॅण्डल मार्चला पान २ वर

निवेदन

## गणित,विज्ञान विषयांत रुपांतर करावे

# पदवीधर गुरुजी बसले बेमुद्दत उपोषणास!

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडः जिल्हा परिषदमध्ये प्राथमिक पदवीधर पदावर कार्यरत असलेल्या भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ प्राथमिक पदवीधर शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांमध्ये रूपांतरण करण्यात यावे या मागणीसाठी सोमवार (दि २८) पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालय बीडसमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. संबंधित शिक्षक हे गेल्या आठ महिन्यापासून गणित/विज्ञान विषयात समावेश करावा म्हणून जिल्हा परिषद बीड कडे मागणी करत आहेत. तसे प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी कार्यालायामार्फत जिल्हा परिषदेकडे ८ महिन्यांपूर्वी दाखल केलेले आहेत. बीड जिल्हा परिषद मध्ये भाषा व



सामाजिक शास्त्र विषयाचे शिक्षक अतिरिक्त असून गणित व विज्ञान विषयाच्या जवळपास ४०० पेक्षा जास्त जागा शिल्लक आहेत. त्यामुळे गणित व विज्ञान या विषयासाठी शिक्षक उपलब्ध व्हावेत व अतिरिक्त शिक्षकाचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार संबंधित शिक्षकांनी ही मागणी केली आहे.

महाराष्ट्रातील सातारा, जालना, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या इतर जिल्हा परिषदांनी गणित / विज्ञान विषयामध्ये रूपांतरण प्रक्रिया स्वतः हून करून दिलेली असताना बीड जिल्हा परिषदने मात्र या विषयी दप्तर दिरंगाईचे धोरण आखलेले आहे. या विषय रूपांतरणामुळे २०२५ च्या बदली प्रक्रियेमध्ये कसल्याही प्रकारच्या शासन नियमाचे उल्लंघन होत नसून ७४ प्राथमिक पदवीधर शिक्षकांपैकी पान २ वर

### अशी आहे संच मान्यता

| विषय संवर्ग | मंजूर | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|
| गणित/विज्ञान | ६०३ | १६१ | ४४२ |
| भाषा | ५७१ | ५२८ | ४३ |
| सामाजिक शास्त्रे | २२४ | ३३६ | ११२ |
| एकूण | १३९७ | ११९१ | ३७३ |

# लेक यूपीएससीमध्ये पास

## दु:खद:पेढे वाटताना वडिलांना हार्टअटॅक



पुण्यभूमी प्रतिनिधी

यवतमाळ:केंद्रीय लोकसेवा परीक्षेचा निकाल जाहीर झाला. लेक यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचं कळताच पेढे वाटत आनंदोत्सव साजरा करताना वडिलांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यातच त्यांचे निधन झाल्याची दु:खद घटना घडली . यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातल्या वागद ( इजारा) येथे घडलेल्या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे.

प्रल्हाद खंदारे असे मृत्यमुखी पडलेल्या वडिलांचे नाव आहे .यूपीएससीच्या निकालानंतर मोहिनी प्रल्हाद खंदारेच्या वडिलांच्या निधनाने संपूर्ण खंदारे कुटुंबीयांवर पान २ वर

## १०० दिवसांतील शंभरी!

जगातील एकमेव महासत्तेच्या प्रमुख पदावर डोनाल्ड ट्रम्प आरूढ झाले त्यास आज २९ एप्रिल रोजी १०० दिवस होतील. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांस पराभूत केल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकी रिवाजानुसार २० जानेवारीस अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. त्या वेळी ‘लोकसत्ता’ संपादकीयाने त्यांच्या झंझावाती प्रारंभाचे वर्णन ‘वॉशिंग्टनची कुऱ्हाड’ (२२ जानेवारी) असे केले. ते किती रास्त होते ते नव्याने सांगण्याची गरज नाही. या वॉशिंग्टन–स्थित ‘कुऱ्हाडी’ने जागतिक अर्थकारण, समाजकारण यांवर सावली धरणाऱ्या वृक्षांची कत्तल इतक्या जोमाने केली की त्यानंतरच्या वणव्यात हा कुऱ्हाडीचा दांडाच आता बळी पडतो की काय अशी स्थिती निर्माण होताना दिसते. या १०० दिवसांत ट्रम्प यांनी जे करून दाखवले ते अद्विितीयच. एरवी समर्थकांचे रूपांतर इतक्या तातडीने विरोधकांत करून दाखवणे हे तसे येरागबाळ्याचे काम नव्हे. ट्रम्प हे अशा सामान्य नेत्यांतले नसल्याने त्यांना हे शक्य झाले. हे यश इतके देदीप्यमान आहे की ते पुन्हा निवडून यावेत यासाठी एके काळी देव पाण्यात घालून प्रतीक्षा करणाऱ्यांची वळलेली बोबडी बराच काळ तशीच राहील असे दिसते. तथापि कडव्या टीकाकारांसही त्यांच्यातील एका दुर्मीळ गुणाचे कौतुक करावेच लागेल. माघार घेणे हा तो गुण. आज पहिल्या शंभर दिवसीय धडाक्यातील एकही मोठा निर्णय असा नाही की ट्रम्प यांनी त्यापासून माघार घेतली नाही वा त्या भूमिकेत बदल केला नाही. त्यांच्या पहिल्या शतकदिन पूर्तीनिमित्ताने या माघारींचा आढावा घ्यायला हवा. तसेच ही वेळ त्यांच्यावर का आली त्या कारणाचाही स्पष्ट उल्लेख करायला हवा.

यातील सगळ्यात ढळढळीत आणि पहिली भव्य माघार म्हणजे त्यांनी स्वत:च स्वत:चा लांबणीवर टाकलेला आयात शुल्क वाढीचा निर्णय. या निर्णयामुळे जगातील सर्व देशांची उत्पादने अमेरिकी बाजारात विकण्यासाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाणे अपेक्षित होते. ही घोषणा झाली आणि अमेरिकी बाजारात जी घसरण सुरू झाली त्यामुळे ट्रम्प यांच्या सल्लागारांचे डोळे पांढरे झाले. जे अमेरिकन ट्रम्प यांच्या सत्तारोहणामुळे येऊ घातलेल्या ‘अच्छे दिनां’कडे डोळे लावून होते त्यांनी आहे ते तरी राहणार की जाणार या भीतीने डोळे फिरवले. अखेर स्वत:च्याच निर्णयास ९० दिवसांची स्थगिती देण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्याकडे ‘होते असे कधी’ असे म्हणून डोळेझाक करता आलीही असती. पण ट्रम्प यांनी या काळात आपल्या निर्णयांपासून माघारी जाण्याचा सपाटा लावला. ज्या शत्रुपक्षीय चीनवर त्यांनी २४५ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क वाढवण्याची धमकी दिली त्याच चीनबाबत त्यांचा सूर नरमाईचा झाला. इतका की चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग अमेरिकेकडे ढुंकून बघण्यास तयार नसताना ट्रम्प यांच्यावर त्यांची आर्जवे करण्याची वेळ आली. तीच बाब अमेरिकेत आलेल्या परदेशी विद्यार्थ्यांबाबत. हजारो विद्यार्थ्यांना ट्रम्प यांनी ‘चले जाव’चा आदेश दिला खरा. पण अमेरिकेचे यामुळे काय नुकसान होईल याचा अंदाज आल्यावर त्यातील निम्म्याहून अधिकांचा हा आदेश त्यांनी मागे घेतला. परदेशी कंपन्यांच्या परदेशातच बनवलेल्या मोटारींवर खचून आयात कराची घोषणा करणारे ट्रम्प नंतर हळूच मोटार उद्योगाचा अपवाद करते झाले. ही माघारमौज फक्त आर्थिक निर्णयांबाबतच दिसून आली असे नाही. मुत्सद्देगिरीतही तेच झाले. ज्या युक्रेनच्या झेलेन्स्की यांना युद्धखोर ठरवत व्हाइट हाऊसमधून अपमानित होऊन जावे लागले त्याच झेलेन्स्की यांची भलामण करण्याची वेळ ट्रम्प यांच्यावर आली. कारण? झेलेन्स्की यांना दूर सारत रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचा पत्कर घेणे राजकीयदृष्ट्या महाग पडेल याची त्यांना उशिरा का असेना झालेली जाणीव. सामान्य अमेरिकी नागरिक अनेक गुन्हे माफ करू शकतो. पण अमेरिकेत एका प्रमादास क्षमा नाही. रशियाची तळी उचलणारा अध्यक्ष अमेरिकी नागरिक सहन करू शकत नाहीत. हे आणि असे बरेच काही अवघ्या १०० दिवसांत घडले.

याचा परिणाम त्यांच्या लोकप्रियतेवर झाला नसता तरच नवल. ऊटपटांग निर्णय, प्रशासकीय हडेलहप्पी आणि महत्त्वाच्या मुद्द्यांवरील धरसोड वृत्ती यांमुळे ट्रम्प यांची लोकप्रियता झरझर घसरत असून पहिल्या १०० दिवसांत इतकी घसरण अनुभवणारे ते अलीकडच्या काळातील पहिले अध्यक्ष ठरतील. इतकेच नव्हे तर उठता–बसता ट्रम्प ज्यांना लाखोली वाहतात ते माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यापेक्षाही पहिल्या १०० दिवसांत ट्रम्प यांच्या लोकप्रियतेची अधिक धूप झाली असे ताज्या पाहण्यांतून दिसते. अध्यक्षपदी आरूढ झाल्यानंतर अवघ्या एक महिन्यात ट्रम्प यांचे समर्थक निम्म्यापेक्षा कमी होऊन ४७ टक्क्यांवर आले आणि आज १०० दिवसांचा टप्पा ते पूर्ण करत असताना हे प्रमाण ४२ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. या तुलनेत बायडेन याचा लोकप्रियता निर्देशांक पहिल्या १०० दिवसांत ५९ टक्के इतका होता. त्यांच्या तुलनेत स्वत:स कर्तबगार, धाडसी इत्यादी समजणाऱ्या ट्रम्प यांची घसरण फारच केविलवाणी. ट्रम्प यांच्यावर जनता रुष्ट होण्याची कारणेही लक्षात घ्यावी अशी. आपला उद्योगपती मित्र ‘टेस्ला’कार आचरट इलॉन मस्क यांच्या सल्ल्याने ट्रम्प यांनी ‘सरकारी कार्यक्षमता विभाग’ सुरू केला आणि एकापाठोपाठ एक अनेक खात्यांत नोकरकपात सुरू केली. हे जनतेस रुचले नाही. प्रत्येकी १०० अमेरिकी नागरिकांतील ५५ जणांनी या नोकरकपातीविरोधात आपले मत नोंदवले. हा रोष इतका आहे की त्याचा फटका खुद्द मस्क यांच्या ‘टेस्ला’ कंपनीसही बसला. लोकांनी या कंपनीच्या मोटारी खरेदी करणे कमी केले. परिणामी कंपनीच्या नफ्यात तब्बल ७१ टक्क्यांची घट झाली. या फटक्याने मस्क यांच्याही डोळ्यासमोर काजवे चमकले आणि त्यांनी या सरकारी खात्यातून बाहेर पडण्याची भाषा सुरू केली. यापेक्षा अधिक अमेरिकी जनता ट्रम्प यांच्यावर नाराज आहे ती आयात शुल्काबाबतच्या धोरणाने. सणसणीत ६० टक्के नागरिकांनी ट्रम्प यांची ही आयात धोरणे चुकीची असल्याचे मत नोंदवले. अमेरिकेस पुन्हा (?) महान बनवण्याच्या नादात ट्रम्प अधिकाधिक जीवनावश्यक वस्तूंची निर्मिती देशांतर्गत करून आत्मनिर्भर होऊ पाहतात.

# कन्हेरवाडीमध्ये जयभिम महोत्सव

## अभिवादन:डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: नांदणं नांदणं, माझ्या रमाचा नांदणं...भिमाच्या संसारी, जसं टिपूर चांदणं...

अशा नानाविध भीम गीतावर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गीतावर ठेका धरत थिरकणारी तरुणाई, सोबतीला विद्युत रोषणाई, तेवढा जोश अन् हर्षोल्हासात अशा वातावरणात कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथे रविवार दिनांक २७ एप्रिल रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडली यानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती सोहळ्याची मागच्या दहा ते पंधरा दिवसापासून जोरदार तयारी सुरू केली होती रविवारी मुख्य सोहळा लक्षवेधी ठरला यासाठी जयंती उत्सव समिती तयारी करत होते रविवारी सकाळपासूनच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्याची भीम सैनिकांना ओढ लागली होती गावात जोरदार तोफांची सलामी ऐकायला मिळाली व फटाक्याची आतषबाजी करण्यात आली रविवारी सकाळपासूनच भीम नगर व समाज मंदिर परिसरात गावातील ग्रामस्थांसह महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती ती गर्दी मिरवणूक होईपर्यंत कायम होती या मिरवणुकीत महिलांची जास्त उपस्थिती दिसून आली रविवारी संध्याकाळी सात साडे सातच्या सुमारास जयंती कमिटीचे अध्यक्ष अक्षय सावंत यांच्या हस्ते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संगीताच्या ठेक्यावर पूर्ण गावातून मिरवणूक मार्गस्थ झाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात मिरवणूक आल्यानंतर सरपंच ड. रामराजे जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष कपिल कवडे, शाबुद्दीन तांबोळी यांच्या हस्ते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले शिवाजी चौक अक्षरशः भीम सैनिकांनी फुलून गेला होता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मोत्सवाचा सोहळा हर्षोल्हासात साजरा करताना दिसून आला रविवारी संध्याकाळी चार वाजल्यापासूनच बाहेरगावच्या भीम सैनिकांनी व महिला भगिनींनी या मिरवणुकीसाठी हजेरी लावली होती यावेळी जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष अक्षय सावंत, उपाध्यक्ष धनंजय खंडागळे, तानाजी सावंत,संजय सावंत,अनंत गायकवाड,माजी सरपंच वसुदेव सावंत,बाळासाहेब माणिक सावंत,प्रताप सावंत,प्रदिप खंडागळे व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्व जबाबदाऱ्या पार पाडून ही मिरवणूक पार पाडली या सोहळ्याला भीमनगर मधील सर्व बौद्ध पासक,बौध्द पासीका आणि गावातील नागरिक यांच्यासह बाहेरगावाहून आलेल्या महिला सह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## पान एक वरून

### भारतात जगातील पहिली रोबोटिक

कार्यालयाच्या संचालिका डॉ. अरुंधती पवार, सह–संशोधक डॉ. संतोष जाधव, डॉ. पंकज कदम, डॉ. योगेश खडतरे आणि डॉ. सारा मरियम (क्लिनिकल रिसर्च कोऑर्डिनेटर), डॉ. विक्रांत साने आणि डॉ. आमोद पाटणकर (सुविधा व्यवस्थापन), लक्ष्मीकांत खानोलकर, सीईओ (इंडिकल), डॉ. मनीषा जाधव (इंडिकल) या सर्वांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प यशस्वी झाला.लुपिन डेंटल, फ्रान्सचे डॉ. गॅलिप गुरेल म्हणाले की, या नाविन्यपूर्ण प्रकल्पावर पुणे येथील भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय) दंत महाविद्यालयासोबत सहयोग केल्याबद्दल आम्हाला आनंद होत आहे. क्लिनिकल चाचणीच्या यशस्वी पूर्ततेमुळे दंतचिकित्सा क्षेत्रातील रोबोटिक तंत्रज्ञानाची क्षमता दिसून येते आणि भविष्यातील प्रगतीचा मार्ग मोकळा झाला. लुपिन डेंटल, फ्रान्सचे सह–संस्थापक डॉ. स्टीफन कौबी म्हणाले की, हा प्रकल्प एक उल्लेखनीय प्रवास आहे आणि आम्ही भारती विद्यापीठ दंत महाविद्यालय, पुणे येथील टीमच्या कौशल्याने आणि उत्साहाने प्रभावित झालो आहोत. दंत रोबोटिक्सच्या क्षेत्रात सतत सहकार्य आणि नवोपक्रमाची आम्हाला अपेक्षा आहे.

### सर्वोच्च न्यायालयाला निवडणूक

ढकलल्या जात आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयात अडकून पडल्याने निवडणुका होत नसल्याचे सांगितले जात आहे. यावर वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी मोठा दावा केला आहे.पहलगाम दहशतवाही हल्ल्यानंतर केंद्रातील मोदी सरकारकडून देण्यात येत असलेल्या प्रत्युत्तरावर प्रकाश आंबेडकरांनी भूमिका मांडली. आम्हाला आंतरराष्ट्रीय स्तरावर बेइज्जत करण्यात आले आहे, सरकारने तिथं कसल्याही प्रकारची कारवाई केलेली दिसत नाही, थातूरमातूर कारवाई केलेली आहे. व्हिसा घेऊन आलेल्यांना परत पाठवणे ही कारवाई होत नाही. ते परत जाणारच होते, त्यात काही नावीन्य नाही, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

### वाळू चोरट्यांवर थेट

६०००/– रुपये असा एकुण १२,००० रु. चा वाळू जप्त केली आहे.याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे सिरसाळा गोरकनाथ बाबासाहेब दहीफळे यांनी फिर्याद दाखल केली असुन आरोपीविरुद्ध कलम ३०३ (२) भान्यास. २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सिरसाळा पोलीस करीत आहेत.

### शेतातल्या गोठ्याला लागली आग

एकर मधील ठिबक संच,बोर मधील अंदाजे एक हजार फुट केबल,गाय गोठा,कोट्यातील धान्य साठा व जीवनावश्यक वस्तू असा अंदाजे एकूण पाच ते सहा लाखाचे नुकसान रुपयाचे नुकसान शेतकऱ्याचे झाले आहे.शेतात ये जा करणाऱ्या शेतकऱ्यांनी ही आग विझवून मोठा अनर्थ टाळला.मात्र व्याहला झालेली जिवंत गाय आणि अंदाजे एक हजार फुट केबल,गाय गोठा,कोट्यातील धान्य साठा व जीवनावश्यक वस्तू जळाल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.त्यांना प्रशासनाकडून तात्काळ मदत मिळणे गरजेचे आहे.

### केज कार्यालयाचा भोंगळ

घ्यायची असेल तर एक – एक तास वाट बघावी लागते ही अतिशय निंदनीय प्रकार आहे कारण शासन अधिकारी कर्मचारी यांना कुठे शेतातील दगड फोडण्यासाठी पगार देत नाही तर खुर्चीवर बसून सही करण्यासाठी पगार देते आहे तरी सुद्धा अधिकारी कर्मचारी जिल्हा परिषद बांधकाम विभाग केज कार्यालयाचे वेळेत हजर नसतात तसेच एखाद्या कामासाठी सही करण्यासाठी लाचलुचपत करण्यात येत आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले तरी संमधीत प्रशासनाने कारवाई करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

### कळंबमध्ये निघाला

हुतात्मा स्मृती स्तंभ नगरपरिषद कार्यालया समोरून सुरुवात झाली अहिल्याबाई होळकर चौक, मेनरोड, सराफालाईन , डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मार्गे हुतात्मा व स्मृतीस्तंभ येथे पोहोचल्यानंतर पहेलगाम येथे अतिरेक्याने केलेल्या अमानुष गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटक नागरिकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून पुष्पअर्पण करून मेणबत्ती लावून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली व राष्ट्रगीत गायन केले या कॅण्डल मार्चमध्ये महादेव महाराज अडसूळ, प्रा. डॉ. संजय कांबळे, मुसादेक काझी, अतुल गायकवाड, रवी नरहिरे, मकरंद पाटील, प्रकाश भडंगे, ड, त्रंबकराव मनगिरे, सतपाल बनसोडे,माधवसिंग राजपूत, भिकचंद लोढा, सुरेश टेकाळे,बाळासाहेब कथले, यश सुराणा, मंगेश यादव, प्रदीप यादव, संदीप कोकाटे, अशोक चोंदे, निर्भय घुले,पद्माकर माने,सचिन क्षिरसागर, श्रीकांत कुलकर्णी, शिवाजी गीड्डे, सतीश खिंवसरा , राजेंद्र बिक्कड, मकसूद शिकलगार ,अनिस बद्रुद्दीन शेख,ज्योती सपाटे, संगीता पांचाळ, सलमा सौदागर, दत्ता गायकवाड, टी. जी. माळी ,यशवंत हौसलमल,संतोष भांडे, अमन शेख, वाजेद तांबोळी, बशीर पठाण,पांडुरंग माळवदे, बापू भंडारे, बबनराव वाघमारे, बाळासाहेब हौसलमल यांच्यासह नागरिकांचा समावेश होता.

### परळीत काँग्रेसचा सद्भावना

तयारीसाठी आज परळी येथे काँग्रेस पदाधिका–यांची बैठक पार पडली या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना राहुल सोनवणे म्हणाले की, परभणी, बीड, नागपूरसह राज्यात नुकत्याच घडलेल्या विविध घटनांनी राज्यातील सामाजिक शांतता भंग करण्याचे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी राज्यात काही शक्ती जाणीवपूर्वक वातावरण बिघडवून महाराष्ट्र अस्थिर व अशांत ठेवण्याचे पातक करत आहेत. दुर्दैवाने या विघातक शक्तींना सत्तेतून आशिर्वाद मिळत आहे. परंतु काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. याआधी मस्साजोग ते बीड व नागपूर शहरात सद्भावना यात्रा काढण्यात आली, जनतेने या यात्रांना प्रचंड प्रतिसाद दिला असून नाशिकमध्येही अशीच सद्भावना यात्रा होत आहे. गेल्या काही दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे. यावेळी परळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष बहादूर भाई, ड प्रकाश मुंडे, प्रकाशराव देशमुख, शिवाजीराव देशमुख यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### लेक यूपीएससीमध्ये

शोककळा पसरली आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगली रँक मिळवत मोहिनी खंदारे या तरुणीनं कुटुंबीयांची मान उंचावली खरी मात्र आपल्या यशाचा आनंद साजरा करणाऱ्या वडिलांवर काळाने घाला घातल्याने मोठे यश आयुष्यभराचं दुःख देऊन जाणारं ठरले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात मोहिनी प्रल्हाद खंदारे हिला ८८४ रँक मिळाला. मुलगी प्रशासकीय अधिकारी होणार या बातमीने सुखावलेल्या वडिलांनी गावकऱ्यांना पेढे वाटायला सुरुवात केली. ग्रामस्थांना पेढे वाटतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. यातच त्यांचा मृत्यू झाला. एकीकडे मुलीचा आनंदाचा दिवस दुसरीकडे वडिलांच्या मृत्यूने क्षणार्धात कुटुंब पोरके झाले. प्रल्हाद खंदारे असे मोहिनीच्या वडिलांचे नाव आहे. पुसद पंचायत समिती बुलढाणा येथे ते सेवानिवृत्त विस्तार अधिकारी होते . त्यांच्या मृत्यूने सारा गाव हळहळलाय.

### पदवीधर गुरुजी बसले बेमुद्दत

जे शिक्षक बदली पात्र आहेत त्यांची शंभर टक्के बदली होणारच आहे. फक्त त्यांचा पहिला विषय बदलून नवीन विषयात त्यांची बदली होणारच आहे. तसेच शासनावरती कसल्याही प्रकारे आर्थिक भार या प्रक्रियेमुळे पडणार नसून कोणालाही वेतन फरक दिला जाणार नाही. तरीही जिल्हा परिषद बीडने गेल्या आठ महिन्यांपासून मा. शिक्षण संचालक, पुणे यांनी विषय बदल करता येईल असे मार्गदर्शन केलेले असतानाही हा प्रश्न प्रलंबित ठेवलेला आहे. आठ महिन्यांपासून हा प्रश्न न सोडवल्यामुळे संबंधित शिक्षकांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली असता मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०३/०४/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत दोन आठवड्यात जिल्हा परिषद प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत मा. शिक्षण संचालकांच्या मार्गदर्शनानुसार हा विषय बदल करून देण्याबाबत आदेश दिलेले आहेत. तरी देखील जिल्हा परिषद प्रशासनाने या आदेशाकडे सविस्तर दुर्लक्ष केल्यामुळे संबंधित शिक्षक हे दिनांक २८/४/२०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर उपोषणास बसलेले आहेत. मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जिल्हा परिषद, बीड यांनी तात्काळ या विषयाची दखल घेऊन संबंधित विषय रूपांतरणाचा प्रश्न सोडवावा अशी विनंती बीड जिल्ह्यातील बीएससी पदवी उत्तीर्ण असलेल्या प्राथमिक पदवीधर शिक्षकांच्या वतीने केलेली आहे. यावेळी विकास गवते, दिलिपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण, ए.एन.सानप, आर. ए. वाव्हळ, ए. जे.कोकाटे, मचिंद्र खाकरे, एम.आर.घोडके, आनंद आळणे आदी शिक्षक बेमुदत उपोषणास बसले आहेत.

## पान सहा वरून

### ...तर महिला शिकल्या

रंग भरला. क्रांतीसुर्य महात्मा फुले जन्मोत्सव समितीच्या सर्व पदाधिकारी व समाजबांधवांनी जयंती कार्यक्रमात परिश्रम घेतले. गावातील शेकडो तरुण या जयंती महोत्सवात सामील झाले होते. दिंद्रुड पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### पंकजा मुंडेंनी स्विकारलं

सहवासही दिला. याबाबतचा एक भावनिक असा व्हिडिओही पंकजाताई मुंडे यांनी सोशल माध्यमातून शेअर केला. नव्या सदस्यांचे अगदी संवेदनशीलपणाने मातृवत स्वागत आणि काळजी घेतानाच्या पंकजाताई मुंडे यात दिसून येत आहेत. हे सर्व पाहतांना शिंदे कुटुंबीय अगदीच भारावून गेल्याचे दिसुन येत आहे. दरम्यान सोनाली शिंदे युट्यूबर असुन त्यांनीही एका व्हिडिओद्वारे पंकजाताई मुंडेंच्या या प्राणीप्रेमाचे व संवेदनाशीलतचे भरभरून कौतुक केले आहे. पोटच्या लेकरांप्रमाणे ज्या पिलांचा आपण सांभाळ केला आता त्यांना अतिशय छान घर आणि पंकजाताईसारखे मातृवत प्रेम करणारे पालक मिळाल्याचा अतिशय आनंद झाल्याचे म्हटले आहे.

### परळी–गंगाखेड महामार्गाचे

प्रति नामदार मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, नामदार माननीय माजी मंत्री धनंजयजी मुंडे, माननीय जिल्हाधिकारी बीड, माननीय तहसीलदार परळी वैजनाथ आणि माननीय पोलीस निरीक्षक संभाजीनगर यांना मेलद्वारे पाठवल्या आहेत. यावेळी अनिल चौधरी, काशिनाथ सरवदे, मुंजाभाऊ साठे ,दगडू भाले, सुंदर आव्हाड, संदीप चौधरी, गिरीश सलगरे, प्रवीण रोडे ,संतोष कांबळे, देविदास मुंडे, प्रमोद गिरी, राम गडदे ,राम चाटे, अनंत कातकडे, पापा क्षीरसागर, श्रीमंत मुंडे,गिवेश मिसाळ,दिनेश मिसाळ, श्याम जाधव आणि भास्कर नावंदे आदीसह मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त

बुद्रे, महाराष्ट्र राज्य रुद्र भूमी निवारण समिती उपाध्यक्ष विकास हालगे, महाराष्ट्र वीरशेव सभा शहराध्यक्ष शहराध्यक्ष नितीन समशेटी, गुरुलिंग स्वामी संस्थान सदस्य दयानंद स्वामी, प्रकाश खोत उपस्थित होते यावेळी परीक्षक म्हणून शेखर फुटके सर, शिवप्रसाद राजनाळे, , सोमनाथ गोपनपाळे, महेश वेरुळे, राजेश साखरे सर यांनी काम पाहिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक नरेश पिंपळे दत्तात्रय गोपानपाळे, , शिवलिंग वाघमारे , गणेश स्वामी, प्रकाश खोत, संदीप चौधरी, शिवकुमार चौंडे, मल्लिकार्जुन साखरे आदी उपस्थित होते. यावेळी असंख्य विद्यार्थ्यांनी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला.

### वर्गमित्रांची भरली पून्हा

होता संघर्ष करत राहण्याचा व ऐकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होण्याचा सल्ला दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख मुबिन ,महेश शेटे तसेच सर्व मित्र मंडळांनी खूप मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र राठोड व सतीश खेडकर यांनी केले तर आभारप्रदर्शन अमर नाटकर यांनी केले.

### कन्हेरवाडी शाळेचे विद्यार्थी

कस्तुरी किशोर कवडे – १२८. हे दहा विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र झाले असुन सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.आज शाळेच्या वतिने सर्व विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक दीपक चाळक,वाघमोडे परमेश्वर, झोरी नारायण,श्रीम.कंगळे आशा व पहिली ते चौथी पर्यंत शिकविणाऱ्या शिक्षिका श्रीम.गाढवे मंगल या सर्वांचा शाळेचे मुख्याध्यापक भंडारे बी. एन व शाळेतील शिक्षक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## ठाणे जिल्हा न्यायालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन उत्साहात

**डोंबिवली :** आपल्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही आपण सामान्य नागरिकांना वेळेवर न्याय देऊ शकत नाही याची आपल्याला जाणीव असली पाहिजे. आजच्या परिस्थितीत सामान्य माणसाला लवकर न्याय मिळण्यासाठी आवश्यक तो विचार आणि उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी आज येथे केले. सध्याच्या जिल्हा न्यायालय, ठाणे आवारातील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते, तर उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. ते म्हणाले की, ठाणे जिल्हा वकील संघटनेने विकेंद्रीकरणाला विरोध केला नाही. ०२ वर्षे सर्वोच्च न्यायालयाच्या माध्यमातून जुने खटले निकाली कसे काढता येतील,याचा ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला आहे. या ॲक्शन प्लॅनच्या अंमलबजावणीत ठाणे अग्रेसर आहे. हे केवळ सर्व वकिलांनी सहकार्य केल्यामुळेच शक्य झाले आहे. सर्वसामान्य नागरिकांना "क्वालिटी जस्टीस" मिळायला हवा त्याकरिता सर्वांनी मिळून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळेल, असे काम करू या, असे आवाहनही त्यांनी शेवटी केले.

# आसनगाव स्थानकात कल्याण-कसारा उपनगरीय प्रवाशांची गैरसोय

### तक्रार करूनही रेल्वे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

शहापूर तालुक्यातील मध्य रेल्वेचे स्थानक असलेल्या आसनगाव परिसरात वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. वाहतुक कोंडी, बेशिस्त रिक्षाचालक, अपुऱ्या सुविधा आणि अपयशी नियोजनामुळे हजारो प्रवाशांना रोज मनस्ताप सहन करावा लागत आहे. याबाबत वारंवार तक्रार करूनही संबंधित रेल्वे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. रेल्वेस्थानक परिसरात बेशिस्त रिक्षाचालक वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहेत. अनेकदा प्रवासी आणि रिक्षाचालकांमध्ये वाद होतात. येथे कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त तैनात करावा, अशी मागणी होत आहे. मात्र, पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे.

मध्य रेल्वेच्या हलगर्जी नियोजनामुळे अनेक लोकल गाड्या उशीराने धावत आहेत. परिणामी, चाकरमान्यांना नेहमीच कार्यालयामध्ये पोहोचण्यास उशीर होतो त्यामुळे लेट मार्कचा त्यांना सामना करावा लागत आहे. मात्र,




### लोकल सेवेचाही सावळा गोंधळ

आसनगाव पूर्वेकडील रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केला असला, तरी तो अतिशय अरुंद आहे. परिणामी, नागरिकांना रेल्वे फाटकापासून मोठ्या अंतरापर्यंत पायपीट करावी लागते. तसेच, रस्त्याच्या समस्यांमुळे 'एसटी' बसस्थानकाजवळ न थांबता अलीकडेच थांबतात. त्यामुळे प्रवाशांना ५०० मीटर चालत जावे लागते.

विकासाच्या नावाखाली येथे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. शहापूरकडून येणारा मुख्य पूल तोडल्यामुळे प्रवाशांना एका पुलाचा वापर करावा लागत आहे.

हा पूल उंच असल्याने वृद्धांसह लहान मुले, रुग्ण आणि महिलांना जिना चढणे अवघड जात आहे. स्थानकाच्या पूर्व भागात नागरी वसाहती वाढल्या असल्या, तरी मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी कोणताही ब्रिज उपलब्ध नाही. त्यामुळे स्थानकाच्या मध्यभागी असलेल्या जिन्यापर्यंत बराच वेळ पायपीट करावी लागते.

पश्चिम दिशेला असलेल्या पुलाची उतरती जागा मध्यंतरीच संपत असल्यामुळे कसारा दिशेच्या गावठाण, मुंडेवाडी, शिवाजीनगर, माहुली, सावरोली आणि संभाजीनगर भागातील प्रवाशांना मोठा फेरा मारून स्थानक गाठावे लागते. त्यामुळे अनेकजण रेल्वे पटरी पार करीत आहेत. ज्यामुळे अपघाताच्या घटना घडत आहेत.

# ग्रामीण महिलांसाठी वाळवणाचा उद्योग

**विनायक बेटावदकर**

**कल्याण**



कोणत्याही सणावाराच्या निमित्ताने किवा घरात काही विशेष कार्य असले, तर जेवणात कुरडया, पापड, मिरगुंडे असे तोंडी लावणे पदार्थ हमखास असतातच पण हे पदार्थ घरी केलेले असतातच असे नाही, तर सरसकट बाजारातून पाकीट बंद आणलेले (तयार) असतात. ग्रामीण भागात आजही काही प्रमाणात घरांपुढे मोकळी जागा दिसते.

त्या जागेत बाजेवर, पलंगावर कुरडया पापड मिरगुंडे वाळवण्याची प्रथा आहे. कल्याणात साधारणपणे ५०-५५ वर्षांचे एक गृहस्थ दोन हातात दोन पिशव्या घेऊन मिरगुंडे पापड हे आपल्या खास शैलीतून आवाज काढून दारोदार विकताना दिसतात. ते कल्याणात जरी मिरगुंडे-पापड विकत असले तरी ते मुळचे मुरबाडच्या पुढील सरळगाव टोकावडे या ग्रामीण भागातले आहेत. तेथून ते हा माल एसटीने कल्याणात आणून विक्री करतात त्यांच्या या मालाला मागणीही भरपूर असते. साधारणपणे दोन-तीन तासातच त्यांचा माल संपतो ते लगेच घरीही जाण्यास मोकळे होतात.

पूर्वीचे दिवस आजही आठवतात. दुपारच्यावेळी वाड्यातल्या चार-पाच महिला एकत्र जमून उडदाचे, पोह्याच्या पीठाचे गोळे, किंवा गव्हाच्या चिकाच्या ओल्या कापडावर पापड- कुरडया घालताना दिसत. त्यांना मजुरी म्हणून रोख पैसे देण्याची पद्धत नव्हती. ज्यांच्या कुरडया पापड असत त्या बाईच तयार केलेले ताजे कुरडया, पापड भेट देत. आता हे सर्व बदलले आहे. घरची कर्ती महिला सकाळी उठून कामावर जाण्यासाठी गाडी पकडण्याच्या गडबडीत दिसते. तिला बोलायलाही वेळ नसतो. शिवाय आता सोसायट्या झाल्याने बहुमजली इमारतींपुढे वाळवणासाठी जागा असतेच असे नाही.

वाडा पद्धती कधीच इतिहास जमा झाली आहे. अशा या परिस्थितीत शहरी जीवनात कुरडया पापड वाळवणाला जागाच नसते. ग्रामीण भागात महिला घरातील गहू, तांदूळ, कडधान्ये कीड लागू नये म्हणून कडक उन्हात ठेवतात. त्याच प्रमाणे गव्हाचा चीक करून पापड कुरडया केल्या जातात. बाजरीच्या खारवड्या ,तांदळाच्या पापड्या आपण मोठ्या चवीने खातो. डाळीच्या पीठाचे सांडगे (वडे) यांची भाजी ही सर्वांनाच आवडते. कोणत्याही कार्यात सांडग्याची भाजी ही असतेच. या शिवाय खास उपवासासाठी बटाटा चिप्स, साबुदाणा चकली, पापड हे पदार्थ सर्वांच्याच आवडीचे आहेत. ग्रामीण भागात धाब्याची घरे असतात. धाब्यावर वाळवणं घालण्याची पद्धत आहे. कावळे पक्षी यांच्यापासून रक्षण करण्यासाठी, लहान मुले हातात काठी घेऊन हौसेने बसतात.

आज महिलांचे बचत गट तयार झाले आहेत.या बचत गटातील महिला नाचणी. तांदळाच्या पापड्या, डाळीचे पदार्थ, साबुदाणा पापड, गव्हाच्या शेवया वगैरे बनवतात. घरगुती बनवलेले पदार्थ म्हणून त्यानाही बाजारात खूप मागणी आहे. अनेक महिलागट असा व्यवसाय करतात. ग्रामीण भागात काही घरांपुढे थोडीफार मोकळी जागा असल्याने असे पदार्थ बनवले जातात. शहरी महिलांना काम उद्योगामुळे तर काहीना अंगणच राहिले नसल्याने ग्रामीण भागात बनवलेल्या या मालाला मोठी मागणी आहे. बंद पाकिटातून ते बाजारात आणले जातात. ग्रामीण महिलांना यातून चांगला उद्योग मिळाला आहे. आता त्यांना आर्थिक सहाय्य आणि मार्गदर्शन हवे आहे.

## वेचक

### मृगाक्षी शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यातून प्रथम

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा बोरिवली येथे शिकणारी विद्यार्थिनी मृगाक्षी राणे इ. ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २४६ गुण संपादन करून तालुक्यातून प्रथम आली आहे. प्राथमिक



शिक्षक नितीन राणे व अर्चना मार्के यांची ही मुलगी इयत्ता पहिलीपासूनच तिला जिल्हा परिषद दाखल केले. मंथन स्पर्धा परीक्षा ३०० पैकी २४४ गुण, नवोदय स्पर्धा परीक्षा १०० पैकी ८८:२५ गुण मिळवून गुणवत्तेची चुनूक दाखवली. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे तालुक्यातून सर्व स्तरावर खूप खूप कौतुक होत आहे. मृगाक्षी राणे विद्यार्थिनी जिल्हा परिषद शाळा बोरिवली येथे कराटेचे प्रशिक्षण देत आहे. एकंदरीत सर्वगुणसंपन्न अशी विद्यार्थिनीच कौतुक होणे साहजिकच आहे. या गोष्टीतून अजूनही शिकायला मिळतेय प्राथमिक शिक्षकांची मुले प्राथमिक शाळेत शिकली तर नक्कीच शाळेची गुणवत्ता वाढीस मदत होईल व शाळेतील इतर विद्यार्थ्यांना त्याचा लाभ व आनंद मिळेल.

### फांगणे येथील आजीबाईच्या शाळेला सुट्टी!

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील फांगणे येथील जगप्रसिद्ध आजीबाई शाळेला मे महिन्यासाठी सुट्टी जाहीर झाली असून वर्षाचा शेवटचा दिवस आजीबाईंनी विविध प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन करून साजरा केला. कै. मोतीराम गणपत दलाल चॅरिटेबल ट्रस्ट संचालित आजीबाई शाळा मार्च २०१६ पासून सुरू आहे. जगभरातील २५ हून अधिक देशांचे. प्रतिनिधी या शाळेच्या भेटीला येऊन गेले आहेत. ६० ते ९६ वयांच्या ३० आजीबाई या शाळेत धडे गिरवत आहेत. शाळेचा या वर्षांतील शेवटचा दिवस आजीबाईनी गाणी, गप्पा, चित्रकला, रांगोळी काढणे, पुढील वर्षातील संकल्प अशा प्रकारे साजरा केला. या कार्यक्रमास हुंडा विरोधी चळवळीच्या आशा कुलकर्णी, प्रसिद्ध डॉ. रश्मी पटवर्धन, पत्रकार मोहिनी जाधव, तन्मय तांबे, शिक्षिका शीतल मोरे उपस्थित होते.

### अवकाळी पावसाने डोंबिवलीकर सुखावले

**डोंबिवली :** उन्हाच्या काहिलीने दीड महिन्यांपासून वातावरण पार करपून गेले आहे. रस्त्यावर फिरताना वा घरात थांबूनही पराकोटीला गेलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे सारेच हैराण झाले आहेत. अशा अस्वस्थ परिस्थितीत शनिवारी मध्यरात्री एक ते दीड वाजण्याच्या सुमारास अचानक अवेळी पावसाने हजेरी लावली. डोंबिवलीच्या शहर आणि ग्रामीण पट्ट्यामध्ये वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाल्याने रहिवासी सुखावले होते. शनिवारी मध्यरात्री सर्वजण गाढ झोपेत असताना डोंबिवलीच्या काही भागातील वीज पुरवठा खंडित झाला होता. इतक्यात अचानक मध्यरात्री एक-दीड वाजण्याच्या सुमारास पाऊस पडू लागल्याने मातीचा सुगंधी दरवळ सर्वत्र पसरू लागला. अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने हवेत गारवा निर्माण झाला.

**एप्रिल महिन्यात ४२ अंश ते ४६ अंश इतक्या तापमानाची नोंद**

## शहापुरात उन्हाचा तडाखा ; तालुक्यातील रस्ते निर्मनुष्य

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

शहापूर तालुक्यासह जिल्ह्यात गेल्या चार-पाच दिवसांपासून उन्हाचा तडाखा वाढला आहे. पारा दिवसेंदिवस वाढत चालला असून कडाक्याच्या उन्हामुळे बाजारपेठेतील वर्दळ कमी झाली आहे. रस्ते निर्मनुष्य झाले आहेत. तर वाढत्या तापमानामुळे जमिनीतील पाण्याची पातळी खोल जात असल्याने पाणीटंचाईत लक्षणीय वाढ झाली आहे. ठाणे जिल्ह्यात एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासूनच सूर्याचा पारा चढू लागला. मात्र, अधूनमधून ढगाळ वातावरण व वादळी सरींनी हवेत गारवा निर्माण करीत नागरिकांना दिलासा दिला होता. आता एप्रिलच्या अखेरीस उन्हाचा पारा प्रचंड वाढला आहे.

आठवडाभरापासून सूर्य आग ओकू लागला आहे. शहापूर तालुक्यात एप्रिल महिन्यातच ४२ अंश ते ४६ अंश इतक्या तापमानाची नोंद झाली आहे.जिल्ह्यात सरासरी तापमानात वाढ होत आहे. भूजल पातळी खालावली असून अनेक ठिकाणी पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. आणखी दीड महिना उन्हाचे चटके सहन करावे लागणार आहेत. दिवसेंदिवस उन्हाची काहिली वाढत असल्याने नागरिकांना असह्य होत आहे. यंदा एप्रिल महिन्यात सुरुवातीपासूनच उष्णतेचा पारा ४० अंशापार गेल्याने पुढे मे महिन्यात काय हाल होतील, याची चिंता तालुकावासीयांना आहे.

**पाण्याची पातळी खालावली**

तापमान वाढीमुळे पाण्याची पातळी झपाट्याने खाली जात आहे. नदीनाले, तलाव आटण्याच्या मार्गावर आहेत. ग्रामीण भागातील विहिरी, बोअरवेलचे पाणीही कमी होत आहे. त्यामुळे यंदा पाऊस चांगला होऊनही तालुक्यातील अनेक गाव-पाड्यांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

**शीतपेयांची मागणी वाढली**

दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्यामुळे नागरिक उन्हापासून बचाव करण्यासाठी उसाचा रस, लिंबू शिकंजी, ताक, तसेच इतर शीतपेयांचा आधार घेत आहेत. त्यामुळे हातगाडीवरील छोटा व्यावसायिकांच्या हाताला काम मिळाले आहे.

## भव्य क्रिकेट ॲकॅडमीचे उद्घाटन उत्साहात

**डोंबिवली :** डोंबिवलीतील नामांकित शिक्षण संस्था 'डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के. व्ही. पेंढरकर कला, वाणिज्य, आणि विज्ञान' महाविद्यालयाच्या मागील भूखंड क्र. ओएस-१६ वर भव्य क्रिकेट ॲकॅडेमीचे उद्घाटन शनिवारी करण्यात आले. या क्रिकेट ॲकॅडेमीला मंडळाचे माजी सभासद व आमदार कै. प्रा. राम कापसे यांचे नाव देण्यात आले आहे. सदर क्रिकेट ॲकॅडेमीचे उद्घाटन श्री. लक्ष्मीकांत देशमुख माजी आयएएस अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. सदप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष्य प्रभाकर देसाई, मंडळाचे सभासद डॉ. प्रसाद कामात तसेच मंडळाचे नवनिर्वाचित नियुक्त सीईओ हर्षल लवंगारे हे उपस्थित होते. अत्यंत वाजवी दारात मुलांसाठी व नागरीकांसाठी सोयी सुविधांनी सुसज्ज, बाराही महीने प्रशिक्षणासाठी खुले केले आहे.

## बोगस मार्कशीट पकडल्याचे सांगून गंडा

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

दहावीत नापास झालेल्या मुलाचे ११ वी ॲडमिशनसाठी बोगस मार्कशीट तयार करीत पोलिसांनी ते बोगस सर्टीफिकेट मार्कशीट पकडले. याची भीती दाखवून मुलाच्या वडिलांकडून १२ लाख २० हजार उकळले. या प्रकरणी महात्मा फुले पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारी नुसार ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पश्चिम येथील राम बाग येथे राहणारे शांतीलाल पटेल हे व्यवसायाने व्यापारी आहेत.

गेल्या वर्षी त्यांचा मुलगा सेजल पटेल दहावीत नापास झाला होता. नापास होऊनही अकरावीत प्रवेश मिळवून देण्याच्या बदल्यात क्रिश गुप्ता, साक्षी गुप्ता आणि पोकर नावाच्या लोकांनी शांतीलाल पटेल यांच्याकडून काही पैसे घेतले. नंतर तिघांनी बनावट दहावीची मार्कलिस्ट तयार केल्याने शांतीलाल पटेल यांना वाटले की आता आपल्या मुलाला प्रवेश मिळेल.

यादरम्यान क्रिश गुप्ता याने शांतीलालला सांगितले की, दहावीचा बनावट मार्कलिस्ट पोलिसांच्या हाती लागला आहे. हे ऐकून आरोपी क्रिश गुप्ता आणि त्याच्या दोन साथीदारांनी पोलिसांच्या बहाण्याने व्यावसायिकाकडून १२.२० लाख रुपये घेतले. आणि त्यांनी लाखोंची रोकड घेतल्याचे स्पष्ट झाले.

## ठाणे जि . प . पदवीधर पदोन्नती प्रक्रिया रखडल्याने शिक्षकांमध्ये नाराजी !

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**



> जिल्हा प्रशासन इतर विभागातील पदोन्नती प्रक्रिया दरवर्षी राबवत असते मात्र शिक्षण विभागातील पदोन्नती प्रक्रिया रावण्यास विलंब होतो. हे नित्याचेच आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाने पदोन्नतीबाबत वेळोवेळी आग्रही भूमिका मांडली असून प्रशासन मात्र दिरंगाई करत आहे. जिल्हा प्रशासनाने पदोन्नती प्रक्रिया तत्काळ करावी.
>
> **- भगवान भगत,** जिल्हाध्यक्ष, ठाणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ

गेले १० वर्षांपासून ठाणे जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षक हे पदवीधर शिक्षक पदोन्नतीकडे डोळे लावून वाट पाहत असल्याचे चित्र दिसत आहे. उच्च प्राथमिक शाळांतील इ.६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषा, विज्ञान व समाजशास्त्र हे विषय शिकवणारे शिक्षक आवश्यक असतात. मात्र २०१४ पासून जिल्ह्यातील पदवीधर शिक्षक पदोन्नती न झाल्याने हजारो विद्यार्थी उच्च शिक्षित शिक्षकांपासून वंचित आहेत. सध्या या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवण्यास शिक्षकच नसल्याने प्राथमिक शिक्षकांनाच या विद्यार्थ्यांना शिकवावे लागत आहे. त्यात पुरेशी शिक्षक संख्या नसल्याने व पदवीधर पदोन्नती न झाल्याने उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थी ठाणे जिल्हा परिषदेने वाऱ्यावर सोडले आहेत की काय अशी स्थिती पाहावयास मिळत आहे.

२०२२ मध्ये जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने विज्ञान व भाषा विषय शिक्षक भरण्याचा प्रस्ताव तयार केला. लोकसभा निवडणूक आचार संहितेपुर्वी ही पदोन्नती प्रक्रिया व्हावी यासाठी अनेक शिक्षकांनी हा प्रस्ताव बनविण्यास प्रशासनास मदत केली मात्र सामान्य प्रशासन विभागाने ऐनवेळी तृटी काढत फाईल परत पाठवली.

त्यानंतर लगेच आचार संहिता लागल्याने प्रक्रिया रखडली. आता अनेक दिवसांपासून लोकप्रतिनिधी व संघटनांनी वेळोवेळी मागणी केल्यानंतर प्रशासनने सहा महिन्यांपासुन प्रस्ताव नव्याने तयार करण्यास सुरुवात केली. मात्र आजतागायत पदोन्नती प्रक्रियेस मुहुर्त सापडत नसल्याने जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी दिसत आहे.

## कोरावळेची पुन्हा नेत्रदीपक कामगिरी

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कोरावळेने केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता ८ वीच्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील तीन विद्यार्थिनींनी उत्कृष्ट यश संपादन करून शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे. यासोबतच, शाळेने वर्षभरात विविध सांस्कृतिक आणि क्रीडा स्पर्धांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत संचिता धुमाळ हिने तालुक्यात प्रथम, अर्चना धुमाळ हिने द्वितीय, तर वेदिका धुमाळ हिने चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. मुरबाड तालुक्यात या वर्षी जिल्हा परिषदेच्या शाळांतील १९५ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते त्यापैकी ४ विद्यार्थी पात्र ठरले असून फक्त कोरावळे शाळेचे ३ विद्यार्थी पात्र झाले असल्याने नक्कीच कोरावळे शाळेने केलेली कामगिरी ही गौरवास्पद आहे. यापूर्वी याच वर्षी एनएमएमएस परीक्षेतही याच विद्यार्थिनींनी तालुक्यात अव्वल स्थान मिळवले होते, हे विशेष उल्लेखनीय आहे.

कोरावळे शाळेतील विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानातच नव्हे, तर इतर कलागुणांमध्येही पारंगत आहेत. वर्षभरात तालुका व जिल्हा पातळीवरील आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला आणि आपल्या कलाविष्काराने व कौशल्याने, मेहनतीने उपस्थितांची मने जिंकली. गायन, नृत्य, आणि क्रीडा स्पर्धांचा समावेश होता. अनेक विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्येही शाळेचे प्रतिनिधित्व करत प्रशंसनीय कामगिरी नोंदवली.

## ठाण्यात मोफत सामुदायिक आरोग्य शिबीर उत्साहात

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या समन्वयाने व कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या पुढाकाराने, ठाण्यात मोफत सामुदायिक आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रस्ते, वीज, शिक्षण, सुरक्षा यांसारख्या सर्व महत्त्वाच्या क्षेत्रात विकासाभीमुख उपाययोजना राबावत असताना, नागरिकांचे आरोग्य देखील अत्यंत महत्त्वाचे आहे हे महायुती सरकार जाणते. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांच्या प्रेरणेने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात सर्वत्र अशी आरोग्य शिबिरे भरवण्यात येत आहे. ठाण्यात आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या नेतृत्त्वाखाली, मो. ह. विद्यालय येथे हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या राबवण्यात आला. ५६३ नागरिकांनी या शिबिराद्वारे रक्तदाब तपासणी, मधुमेह तपासणी, नेत्र चिकित्सा यांसह तज्ज्ञ डॉक्टर्सकडून रोग निदान, शिबिरानंतर आवश्यक रुग्ण शस्त्रक्रिया, रक्त व लघवी चाचणी व ई.सी.जी. तपासणी इत्यादी विनामूल्य सुविधांचा लाभ घेतला, तसेच केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी आयुष्मान भारत योजनेद्वारे गरीब आणि वंचित नागरिकांना ₹ ५ लाख पर्यंतचे मोफत रुग्णालयीन उपचार प्रदान करण्याकरिता आयुष्मान कार्डचे वितरण करण्यात आले. तसेच मोफत नेत्रचिकित्सेबरोबरच नागरिकांना विनामूल्य चष्म्यांचे वाटप देखील करण्यात आले.

## स्मशानभूमीत दिसत आहेत बाल कामगार

**कल्याण :** डोंबिवली पूर्वेकडील एका स्मशानभूमीत बाल कामगार काम करत असल्याचा व्हीडिओ सामाजिक माध्यमात व्हायरल होते आहे. यावर कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ आमदार राजेश मोरे यांनी येथील ठेकेदारावर कारवाई करावी व ठेका रद्द करावा, अशी प्रशासनाकडे केली आहे. बाल कामगार सुधारणा कायदा २०१६ हा कायदा १ जानेवारी २०१६ रोजी लागू झाला. या कायद्याने १४ ते १८ वयोगटातील मुलांनाही धोकादायक कामांवर काम करण्यास बंदी घातली आहे आणि कायद्याच्या विरोधात आहे.

**पाण्यासाठी प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव**

# शहापूर तालुक्यातील पानवठ कोरडे पडल्याने पशु-पक्ष्यांचे हाल

◆ **शहापूर (वार्ताहर) :**

शहापूर तालुक्यात नैसर्गिक विपुलता असून येथे तानसा अभयारण्य आहे; परंतु ऐन उन्हाळ्यात पशु-पक्ष्यांना या वनातील पाण्याचे पाणवठे, तळे व डबके कोरडे ठाण पडले असल्याने येथील प्राण्यांना पाणी पिण्यासाठी मानवी वस्तीकडे वळून लोक वस्तीतील रहिवाशांवर प्राणी हल्ले करण्याची शक्यता वाढली आहे. गेल्या काही वर्षांपासून लोकवस्तीत बिबट्या, रानडुक्कर यांसारखे हिंस्र प्राणी हल्ले करीत असून त्यात अनेकांना आपला जीव व काहींना गभीर जखमी व्हावे लागले आहे. यासाठी वनविभाग, सामाजिक संघटना यांनी वनात या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे गरजेचे आहे.

तालुक्यातील दाट जंगलातील टेकडावरील जंगलातील अनेक झरे पावसाळ्यात ठिकठिकाणच्या पाणवठ्यात पाण्याने भरलेले असतात, तर कधी डबक्यात साठवलेल्या पाण्याच्या रूपाने आढळणारे जंगलातील ओहळ आज गेल्या चार-पाच वर्षांपासून कोरडे ठाण पडत आहे. त्यामुळे या ठिकाणी चीटपाखराला प्यायलाही पाणी मिळत नाही अशा प्रकारचे दृश्य आज तालुक्यात सर्वच पाणवठ्यावर पाहायला मिळत असून हे वन्यजीवांसाठी धोकादायक आहे. तानसा अभयारण्यातील पाणवठ्यात पाणी नसल्याने येथील प्राणी पाण्यासाठी वणवण भटकत असून पाणी पिण्यासाठी मानवी वस्त्यांकडे भरकटू लागले आहेत. तानसा अभयारण्यातील पाणवठ्यावर वन्य प्राण्यासाठी पाण्याची व्यवस्था लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे वनक्षेत्रपाल एकनाथ रोंगटे यांनी सांगितले.



**जंगलातील नैसर्गिक पाणवठेही आटले**


जंगलातील सर्वच नैसर्गिक पाणवठे नाहीसे होत असून त्यासाठी पावसाळ्यातील पाणी जमिनीत मुरविणे गरजेचे झाले आहे, तर कृत्रिम पाणवठे तयार करून त्यात टँकर किवा बैलगाडीने पाणी टाकून वन्य प्राण्यांची तहान भागविणे गरजेचे आहे.

> पशु-पक्ष्यांना कडक उन्हामुळे त्रास होत असल्याने व जंगलातील त्यांचे अधिवास असलेले पाणवठे सुकले असून त्यात पाणी नसल्याने त्यांचे जीव धोक्यात आले आहेत, त्यासाठी प्राणी मित्र संघटनानी उपाययोजना करने गरजेचे असून घराजवळ प्रत्येकाने पशु-पक्ष्यांसाठी पाणी उपलब्ध करून ठेवण्याची गरज आहे.
>
> **- वैभव गंधे,** प्राणी मित्र

## मीरा-भाईंदर फेरीवाला समितीसाठी आरक्षण सोडत

◆ **भाईंदर (वार्ताहर):**

मीरा-भाईंदर फेरीवाला समितीच्या ८ सदस्यांसाठी झालेल्या आरक्षण सोडतीत अनुसुचित जमाती, अल्पसंख्याक महिलाना प्रत्येकी एक जागा आरक्षित झाल्याने आता समितीत काम करण्याची संधी या प्रवर्गातील महिलाना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या पथविक्रेता निवडणूक नियम प्रणालीमध्ये नमूद केलेल्या २० सदस्य संख्येमध्ये ८ पथविक्रेते सदस्य असणार आहेत. सदरचे ८ पथविक्रेता सदस्य पथ विक्रेतांमधून निवडून द्यावयाचे आहेत. त्यात अनुसूचित जाती, अनुसुचित जमाती, दिव्यांग, अल्पसंख्याक, इतर मागासवर्गीय आणि तीन महिला सदस्य यांचा समावेश आहे. तीन महिला सदस्यांपैकी एक सर्वसाधारण प्रवर्गसाठी तर दोन सदस्यांसाठी आरक्षण सोडत काढण्यात आली.




मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या सहकार्याने फेरीवाला समिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेचे सहाय्यक आयुक्त तुषार सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या आरक्षण सोडतीत एक अल्पसंख्याक आणि एक अनुसुचित जमाती महिलासाठी आरक्षित झाली आहे. मनपा क्षेत्रातील ८ हजार ५२८ नोंदणीकृत पथ विक्रेत्यांची तयार केलेली यादी मतदार यादी असणार आहे. तसेच निर्देशानुसार निवडणूक प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

# ग्रामीण भागातील गरिबी घटली, मोदींचे कौतुकास्पद कार्य

जागतिक बँकेच्या एका ताज्या अहवालानुसार, भारताने २०११ पासून ते २०२२-२३ या कालावधीत १७.१ कोटी लोकांना अत्यधिक गरिबीच्या खाईतून बाहेर काढले आहे. यात दररोज २.१५ डॉलर खर्च करू शकणाऱ्या गरिबांचा समावेश होतो आणि ते आता गरिबीच्या खाईतून बाहेर आले आहेत. देशाचा अत्यधिक गरिबीचा दर १६.२ टक्के इतका होता, तो आता घटून केवळ २.३ टक्के उरला आहे. ही आर्थिक आघाडीवर निश्चितच आनंदाची आणि प्रत्येक भारतीयाने हुरळून जावे अशी बातमी आहे हे निश्चित. जागतिक बँकेने भारताच्या गरिबीचे उन्मूलन आणि रोजगार क्षेत्रात केलेल्या कामाचे कौतुक केले आहे. भारतासाठी हे वैश्विक यश आहे, असे जागतिक बँकेने म्हटले आहे. भारतात रोजगार आघाडीवर प्रशंसनीय चित्र असून कार्यशील वयातील रोजगारक्षम लोकांची संख्या अत्यंत तेजीने वाढत आहे आणि हे एक सकारात्मक संकेत आहे असे जागतिक बँकेने म्हटले आहे.

भारत हा विकसनशील देश आहे आणि तो २०४७ सालात जात असताना विकसित देश म्हणून उभरेल अशी प्रत्येकाला आशा आहे. त्या दृष्टीने पावले पडत आहे आणि त्या संदर्भात जागतिक बँकेचा अहवाल भारतासाठी आशादायक आहे. काँग्रेसच्या काळात गरिबी हटावचे नुसतेच नारे दिले जात होते. इंदिरा गांधी आपल्या भाषणात मोठमोठ्या घोषणा करत असत आणि लोक त्यांच्या मागे त्या घोषणा देत असत. पण प्रत्यक्षात गरिबी हटली तर नाहीच, उलट काँग्रेसवाले गल्लीतील नेते अधिकाधिक श्रीमंत होत गेले आणि लोक मात्र गरीबच राहिले आणि आज जे आपण देशाचे दुर्दैव पाहतो आणि त्यात गरिबांचे हाल झालेले पाहतो त्याला काँग्रेसच जबाबदार आहे असेच म्हणावे लागेल. पण हे लोकांना ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे. मोदी यांनी गरिबी कमी करून दाखवली आहे आणि भारत आज विकसित देशाच्या दिशेने निघाला आहे त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. कोविडच्या काळात मोदी यांच्या सरकारने गरिबांसाठी जी योजना आणली त्यामुळे गरिबांना पोटभर अन्न मिळाले आणि भारताचे अन्य देशांसारखे हाल झाले नाहीत. पण तो मोदींचा प्रचार म्हणून आपण त्याकडे दुर्लक्ष करत होतो. पण आता जागतिक बँकेसारख्या संस्थेने आणि त्यात कुणीही मोदी भक्त नाहीत याची दखल घ्यावी, त्या बँकेने गरिबीचा दर घटला आहे असा अहवाल दिला आहे आणि ही निश्चितच भारतासाठी समाधानकारक आणि प्रशंसेस पात्र अशी घटना आहे. यातही एक चांगली बाब अशी की ग्रामीण गरिबीचा दर आता घटून केवळ २.८ टक्के राहिला आहे, तर शहरी गरिबीचा दर १.७ टक्के राहिला आहे.

३७.८ कोटी लोक गरिबीच्या जोखडातून बाहेर निघाले आहेत. सर्वात जास्त गरीबी घटलेले राज्यात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशचा समावेश आहे. आता विरोधक यात बोंब मारतील की यात राज्यांत भाजपाची सत्ता असलेले राज्य जास्त आहेत. पण त्यात पश्चिम बंगाल आणि बिहार आहे हे ते विसरले असतील, तरीही लोक विसरत नाहीत. रोजगार वृद्धीची कार्यशील लोकसंख्याही वाढली आहे आणि शहरी बेरोजगारी घटून ६.६ टक्क्यांवर आली आहे, तर महिलांच्या रोजगारी आणि स्वयंरोजगारात वाढ झालेली पाहायला मिळाली आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांत ही बेरोजगारी कमी होण्याचे अनेक अर्थ आहेत. त्यामुळे येथे रोजगार वाढतील आणि गुन्हेगारी कमी होईल तसेच फसवणुकीचे प्रकार कमी होतील. बेरोजगारी कमी होण्याचा अर्थ त्याचा सामाजिक दुष्परिणाम कमी होण्यावरही असतो याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ग्रामीण गरिबी घटण्याचे अनेक सकारात्मक परिणाम पाहायला मिळत आहेत आणि त्यापैकी एक आहे तो म्हणजे आर्थिक विकासाच्या दरात वाढ होणे, जीवनशैलीत सुधारणा आणि रोजगाराच्या संधी व्यापक प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत.

नुसती गरिबी घटवण्यात यश आलेले नाही, तर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या बाबतीतही भारताने बाजी मारली आहे. हे निश्चितच प्रगतीचे पाऊल आहे. हे यश केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या योजना आणि सामाजिक विकास कार्यक्रमाचे आहे असे निर्मला सीताराम म्हणाल्या त्यात तथ्य आहे. पण यात भारतीय जनतेला धन्यवाद द्यायला हवेत कारण भारतीय जनतेने सरकारवर विश्वास दाखवून सरकारला साथ दिली आणि भारताने या दिशेने एक उदाहरण बनवण्यात सरकारच्या बरोबरीने आपला वाटा उचलला असे म्हणावे लागेल. काँग्रेसच्या काळात गरिबी हटावचा नारा दिला जायचा पण गरिबी हटवण्यात काँग्रेस सरकारला कधीच यश लाभले नाही. कारण ती कारणे सर्वांना माहीतच आहेत. पण भाजपाच्या काळात मोदी सरकारने गरिबी घटवून दाखवली आहे आणि त्यामुळे मोदी यांची प्रशंसा करावी लागते. एसबीआय अहवाल किंवा जागतिक बँक अहवाल हे सांगतात. यात मोदी यांचा चमचा किंवा स्तुतीपाठ कुणीही नाही. त्यामुळे या अहवालाची दखल घ्यावी लागते. गरिबीचा दर कसा ठरवला जातो याची एक पद्धत आहे. त्यानुसारच भारतातील गरिबी कमी झाली आहे आणि त्यात काहीही सरकारची आकड्यांची चलाखी नाही हे नमूद करणे आवश्यक आहे. २०१४ मध्ये मोदी सत्तेवर आल्यापासून देशाची गरिबी सातत्याने कमी होत आली आहे आणि हे कौतुकास्पद आहे. अमर्त्य सेन म्हणत की जोपर्यंत शेवटच्या पायरीवरील माणसाला जोपर्यंत सरकारच्या योजनांचा स्पर्श होत नाही तोपर्यंत सरकारी योजना कुचकामी आहेत गरीबीही केवळ अभावग्रस्त जीवनच नव्हे, तर माणसाला त्याच्या आयुष्यात मिळणाऱ्या व्यापक संधींचा चेहरा असतो. अमर्त्य सेन भाजपाच्या विचारधारेचे कठोर टीकाकार होते. पण सेन यांना अभिप्रेत असलेले सारे काही गरिबांच्या जीवनात मोदी यांनीच आणले आहे हे येथे उल्लेखनीय आहे.

# जल पर्यटनाची नवी दिशा…



महाराष्ट्रात विशेषतः मुंबई आणि कोकणातील पाच जिल्हे हे ७२० किलोमीटरच्या विस्तीर्ण अशा समुद्र किनाऱ्यांनी वेढलेले आहेत. जलवाहतुकीच्या माध्यमातून जल पर्यटनाचे एक मोठे विस्तीर्ण क्षेत्र आगामी काळात मुंबई त्याचप्रमाणे मुंबई, महानगर क्षेत्र आणि विशेष करून कोकण प्रांत याकरिता खुले होणार आहे. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरचा मोठा ताण हा निश्चितच आगामी काळात जलवाहतुकीच्या माध्यमातून कमी होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर जलवाहतुकीच्या माध्यमातून पर्यटनाचे एक मोठे विस्तीर्ण क्षेत्र रोजगार स्वयंरोजगार आणि व्यापाऱ्याच्या माध्यमातून खुले होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या अथक आणि सततच्या प्रयत्नांमधून आणि जलवाहतुकीला चालना देण्याच्या प्रयोजनामधून आगामी काळात जलवाहतुकीद्वारे पर्यटनाची दारे मराठी तरुणांना तसेच तरुणींनाही खुली होणार आहेत.

कोकणात जाण्यासाठी कोकण रेल्वे त्याचप्रमाणे रस्ते महामार्ग आणि त्याचबरोबर आता चीपी आणि मनोहर पर्रीकर विमानतळ या दोन विमानतळामुळे हवाई वाहतुकीचा पर्याय देखील कोकणसाठी आणि गोव्यासाठी उपलब्ध झाला आहे. अर्थात येतील हवाई वाहतुकीचा पर्याय आहे हा तसा महागडा आहे. त्यामुळे तो सर्वसामान्य प्रवाशांना परवडेलच याची कोणतीही शाश्वती देता येत नाही. त्यामुळे साहजिकच कोकणात किंवा गोव्याला जायचे म्हटले की रेल्वे किंवा रस्ते वाहतुकीला आपसुकच प्राधान्य मिळते. कोकण रेल्वेमुळे जरी रेल्वे प्रवासाची मोठी सुविधा उपलब्ध झाली असली तरी अद्यापही कोकणात जाण्यासाठी गाड्यांची संख्या ही तशी मर्यादितच आहे. त्यामुळे साहजिकच कोकणात जाऊ इच्छिणाऱ्या आणि कोकणातून पुन्हा मुंबईत येणाऱ्या चाकरमान्यांसाठी कोकण रेल्वेचे आरक्षित तिकीट मिळणे म्हणजे त्याला स्वर्ग दोन बोटे उरणे इतके महत्त्व आहे. गणपती, होळी, कोकणातील जत्रा, यात्रा, उत्सव, शिमगा या काळात तर कोकण रेल्वे हे कायमस्वरूपी हाऊसफूल असते. त्यामुळे बऱ्याचवेळा प्रवाशांच्या पदरी आरक्षित तिकिटाअभावी निराशा पदरी पडते. रस्ते वाहतुकीने जायचे म्हटले, तर एकतर किमान दहा ते बारा तास हे मुंबई ठाण्याहून सिंधुदुर्गात जाण्यासाठी लागतात. त्याशिवाय खासगी गाडी भाडे तसेच येण्या जाण्याचा खर्च हा सर्वसामान्य कोकणी माणसाला परवडण्यापलीकडे असतो. मात्र तरीही कोकणात रस्ते मार्गाने जाणारे चाकरमानी स्वतःच्या गाड्या घेऊन अथवा खासगी गाड्या भाड्याने घेऊन मोठ्या प्रमाणावर कोकणात जात-येत असतातच. अर्थात हे सर्व पर्याय जरी कोकणी माणसाला उपलब्ध असले तरीदेखील जलवाहतुकीला चालना देऊन पर्यटनाची एक नवी संधी तसेच एक नवीन क्षितीज हे आगामी काळात मुंबईसह कोकणातील प्रमुख शहरांमध्ये उपलब्ध होणार आहे. याकरता राज्याचे मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे हे अत्यंत प्रामाणिकपणाने कष्ट घेऊन मुंबई, कोकणातील जलवाहतुकीला चालना देण्याचे काम करत आहेत. यंदा गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना मंत्री नितेश राणे यांनी मोठी गुड न्यूज दिली असून माझगाव (मुंबई) ते मालवण जलवाहतुकीने अवघ्या पाच तासांत पोहोचता येणार आहे. त्यामुळे गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना यंदा कोकण रेल्वेचे तिकीट जरी मिळाले नाही तरी काळजी करण्याचे कारण नाही. कारण महाराष्ट्र सागरी मंडळाने रो रो बोट सेवेद्वारे जलवाहतुकीची जलद सेवा चाकरमान्यांसाठी गणेश चतुर्थीला उपलब्ध करून दिली आहे.

महाराष्ट्रनामा

राज्य सरकार जलवाहतुकीच्या क्षेत्रात मोठे काम करत असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या क्षेत्रात भविष्यात असणाऱ्या जलपर्यटनाच्या संधी लक्षात घेऊन अधिकाधिक काम करण्यास प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच यंदाच्या गणपती उत्सवात सिंधुदुर्गात जाऊ इच्छिणाऱ्या गणेशभक्तांसाठी माझगावपासून ते थेट मालवणपर्यंत रो-रो बोट सेवेद्वारे जलवाहतूक सुरू करण्यात येणार आहे. या जलद जलवाहतुकीमुळे अवघ्या पाच तासांत मुंबईकर चाकरमानी हे मालवणला पोहोचू शकणार आहेत. थेट दुचाकी, चारचाकी गाडी घेऊन माझगाव ते मालवण हा जलप्रवास जलदगतीने करता येणे शक्य आहे. ही रो-रो सेवा प्रवाशांबरोबरच त्यांच्या गाड्यांनाही माझगावपासून थेट मालवणपर्यंत घेऊन जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी त्यांची गाडी घेऊनच थेट माजगाव येथे बसावे आणि मालवण अथवा विजयदुर्ग येथे पोहोचल्यावर तीच गाडी घेऊन आपल्या गावातील घरी पोहोचावे अशीही डोअर टू डोअर सेवा असणार आहे. याकरता मालवण आणि विजयदुर्ग असे दोन पर्याय देण्यात आले असून ज्यांना मालवण येथे पोहोचायचे असेल त्यांनी मालवणला, तर ज्यांना विजयदुर्ग येथून कोकणातील आपल्या गावी जायचे असेल त्यांच्याकरता विजयदुर्ग येथे दुसरा पर्याय देण्यात आला आहे. यामुळे दरवर्षी गणपतीच्या निमित्ताने कोकणात जाऊ इच्छिणाऱ्या चाकरमान्यांना रस्ते वाहतुकीच्या तसेच रेल्वेचे तिकीट न मिळाल्यामुळे होणाऱ्या त्रासापासून मोठा दिलासा मिळणार आहे. या जलवाहतुकीमुळे कोकण रेल्वे वरील त्याचप्रमाणे रस्ते वाहतुकीवरील प्रवाशांची गर्दी तसेच वाहतुकीवरील ताण हा मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकणार आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या माध्यमातून पर्यटन, व्यापार, उद्योग, रोजगार, स्वयंरोजगार आणि नोकरीच्या संधी देखील तरुण-तरुणींसाठी उपलब्ध होणार आहेत. याबरोबरच मुंबई महानगर प्रदेशातील वॉटर ट्रान्सपोर्टला म्हणजेच जलवाहतुकीला शासकीय पातळीवर गती देण्याचे काम प्रगतिपथावर असून याबाबतचे डीपीआर (सविस्तर प्रकल्प अहवाल) तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. यावर्षी नाही मात्र आगामी वर्षात साधारणपणे फेब्रुवारी, मार्चच्या सुमारास कोचीनच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशातील वॉटर मेट्रोला मान्यता देण्यात येईल. याकरता मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी, वसई, विरार, मीरा-भाईंदर अशा आठ ठिकाणी वॉटर मेट्रो करता टर्मिनल उभारण्यात येणार आहे. वॉटर मेट्रोचा मार्ग निश्चित करून याबाबतचा आराखडा ही अंतिम करण्यात येणार आहे. या वॉटर मेट्रोमुळे मुंबई महानगर प्रदेशातील रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरचा पडणारा मोठा ताण हा विभागला जाणार असून जलवाहतुकीचा मोठा पर्याय आगामी काळात मुंबई, ठाणे आणि पालघरवासीयाना खुला होऊ शकणार आहे.

मुंबईमध्ये रस्ते वाहतूक आणि उपनगरीय रेल्वे सेवा त्याचबरोबर बेस्ट आणि एमएमआरडीए परिसरातील महापालिकांच्या स्थानिक परिवहन सेवा यांच्यावर प्रवासी वाहतुकीचा प्रचंड ताण असतो. एका सर्वेक्षणानुसार मुंबई-ठाणे जिल्हा पालघर आणि रायगड जिल्हा असे जर एमएमआरडीएचे क्षेत्र लक्षात घेतले तर साधारण दररोज दोन ते अडीच हजार नव्या चार चाकी गाड्या या रस्त्यावर येत असतात. वाहनांच्या प्रचंड आणि बेसुमार गर्दीमुळे रस्त्यावरील वाहतुक कासव गतीने होत असते. त्यात दररोज काही हजार गाड्यांची भर पडत असल्यामुळे रस्त्यावर कुठेही जरासे खड्ड जरी झाले तरी रस्ते वाहतूक कोलमडून पडते आणि वाहनचालक व प्रवासी हे तासंतास ट्रॅफिक जाम मध्ये अडकून पडतात. त्यामुळेच रस्ते वाहतुकीला त्याचबरोबर सकाळ-संध्याकाळ आणि अगदी दुपारी देखील तुफान गर्दीत ओसंडून वाहणाऱ्या मुंबईच्या उपनगरीय लोकल वाहतुकीला जर जलवाहतुकीची जोड मिळाली तर निश्चितच मुंबई ठाणे जिल्हा पालघर जिल्हा तसेच रायगड जिल्ह्यापर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण अशा मुंबई महानगर क्षेत्राला मोठा दिलासा मिळू शकणार आहे.

**- सुनील जावडेकर**

# आमची बेस्ट सक्षम व्हावी…



मुंबईकरांच्या जिव्हाळ्याचे संबंध असणारा बेस्ट उपक्रम सध्या बिकट आर्थिक परिस्थितीतून जात आहे. त्याचा परिणाम बेस्ट उपक्रमावरच नव्हे तर उपक्रमाच्या लाखो प्रवाशांवर झाला आहे. वेळेवर बस न मिळणे, बस गाड्यांची दुरावस्था, खाजगीकरणामुळे लागलेली वाट हे पाहता दोन आठवड्यांपूर्वी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक एस. व्ही. श्रीनिवासन यांची भेट घेतली होती. आता गेल्याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्रीवर बेस्ट उपक्रमाच्या संबंधित विषयांवर एक बैठक बोलावली. बेस्ट उपक्रम आता या परिस्थितीतून बाहेर काढायचा असेल तर काय करता येईल यावर बरीच चर्चा झाली. हे मात्र खरे की, आता कुठून तरी सुरुवात झाली आहे. अशा वेळेस काही बेस्ट प्रेमी संघटना बेस्ट प्रेमी मंडळीही यात उतरली असून शनिवारी आमची मुंबई आमची बेस्ट या संघटनेने लोकांच्या सार्वजनिक वाहतुकीच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी जन सुनावणी घेतली.

यात मुंबई शहरातून असंख्य प्रवासी नागरिक सहभागी झाले होते. प्रत्येकजणांनी आपापल्या परिसरातील व दैनंदिन येणाऱ्या रोज समस्यांचा पाढा वाचला. यातून बेस्टला बाहेर पडण्यासाठी अजून किती प्रयत्न करावे लागणार आहेत ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली. बेस्टमधील संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. २०१७ मध्ये बेस्ट व्यवस्थापन आणि मुंबई महानगरपालिका यांनी मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक सेवेला अकार्यक्षम आणि तोट्यात जाणारी घोषित केली आणि तोटे कमी करण्याच्या नावाखाली खाजगी कंत्राटदारांना प्रवेश दिला. तथापी या धोरणामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. बेस्टच्या वाढत्या तोट्यांसोबतच खाजगीकरणाने प्रवाशांवर आणि नागरिकांवर नवे संकट ओढवले आहे. ठेकेदारांचे अपयश, वारंवार बस बंद पडणे, असंतुष्ट कामगार, त्रस्त प्रवासी, अपुऱ्या आणि निकृष्ट सेवांचा वाढता आलेख हे पाहता सार्वजनिक परिवहन व्यवस्था निष्क्रिय होण्याच्या मार्गावर आहे. प्रत्येक मुंबईकरांचा सार्वजनिक वाहतुकीवर हक्क आहे. ही सेवा केवळ सुविधा नसून ती शहराच्या सामाजिक आर्थिक आणि पर्यावरणीय समतोलासाठी अत्यावश्यक असते. सार्वजनिक सुनावणीचा उद्देश शहराच्या विविध भागातील वैयक्तिक प्रवासी आणि संस्थांना एकत्र आणण्याचा असून सार्वजनिक वाहतुकीबाबतचे त्यांचे अनुभव दस्तऐवजीकरण सादर करणे व सध्याच्या संकटाची मूळ कारणे शोधणे आणि लोकाभिमुख आणि शाश्वत उपाय शोधणे हे होते.

बेस्ट उपक्रम सध्या स्वतःच्या बस गाड्यांची संख्या ३३३७ वरून ८९८ झाली आहे. यामुळे बेस्टच्या ६ हजार कर्मचाऱ्यांना कामाविना बसून राहावे लागत आहे. बेस्टने अत्यावश्यक लांबच्या मार्गावरील सर्व बेस्ट बस मार्ग आणि बसेस बंद केल्या आहेत. बेस्टने ठेकेदारांच्या बसेस चालवल्याने प्रवाशांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेने मुंबईच्या नागरिकांकडून कर वसूल करून अंदाजे ९३ हजार कोटी रुपयांच्या ठेवीतून बेस्टला निधी न देता खाजगी गाड्यांसाठी कोस्टल रोडसारख्या महागड्या प्रकल्पावर खर्च सध्या महानगरपालिका करीत आहे. त्यामुळे आशियातील एक सर्वोत्तम बस सेवा अतिशय वेगाने संपवण्याचा हा पालिकेचा डाव आहे, तर बेस्टच्या सार्वजनिक वाहतूक सेवेचे सात वर्षात इलेक्ट्रिक बसमध्ये रूपांतर करण्याची घोषणा करून येणाऱ्या काळात कंत्राटदारांकडून भाड्याने बसेस घेण्याची सक्ती बेस्टवर राज्य शासन करीत आहे. सर्वात जास्त प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषण निर्माण करणाऱ्या खाजगी गाड्यांसाठी मार्ग मोकळा करीत आहे. बेस्ट प्रशासनाने ज्या खाजगी बसेस चालू केल्यात त्या सुद्धा प्रवाशांसाठी सुखकर नाहीत. त्या अनेकवेळा नादुरुस्त अवस्थेत चालवल्या जातात. याचा फटका सर्व प्रवाशांना बसत असल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली.

सार्वजनिक वाहतुकीचे संपूर्ण खाजगीकरण करण्याच्या योजना आखल्या जात आहेत. कंत्राटदारांना बस खरेदीसाठी ७५ टक्के सबसिडी देत आहे. बेस्ट मोठ्या कंपन्यांच्या कंत्राटदारांच्या हवाली करण्याचा हा डाव आहे. तर तिथे दुसरीकडे मात्र कंत्राटदार बेस्टची पूर्णपणे विक्री होण्याची बिल्डर आतुरतेने वाट पाहत आहेत. टप्प्याटप्प्याने भाडेवाढ आणि बेस्टच्या मौल्यवान जमिनी हडप करण्याचा त्यांचा डाव आहे. त्यांना एक रुपये प्रति वर्ष वार्षिक दराने बस पार्किंगसाठी म्हणजे फुकट जागा देण्यात आली आहे. वीस वर्षांपूर्वी बेस्ट ही मुंबईची शान होती. आज तिला वाचवले नाही तर पुढच्या दोन वर्षात नक्कीच बेस्टचा सर्वनाश होण्यास वेळ लागणार नाही, असे मत यावेळी बहुतांशांकडून व्यक्त करण्यात आले. तर आता त्यासाठी पर्याय काय, तर आपण काय करावे आपण योग्य वेळी आवाज उठवला पाहिजे. कारण सामान्य नागरिकांना प्रवासासाठी बेस्ट हाच एक पर्याय आहे. सार्वजनिक वाहतूक हा आपला अधिकार आहे. कुणी आपल्यावर केलेले उपकार नाही. सार्वजनिक वाहतुकीचा अधिकार नाकारणे जीवनाचा अधिकार नाकारण्यासारखेच आहे. येथील मंच कमी होत जाणाऱ्या बसेसची संख्या बंद केलेल्या बस मार्गांच्या विरोधात आणि बेस्टच्या खाजगीकरणाच्या विरोधात एकजुटीने लढा उभारण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

या जनसुनावणीत बेस्ट बस गाड्यांची संख्या किमान ६००० च्या वर आणा व बेस्ट कामगार वाचवा. बेस्ट परवडणारी आणि सुरक्षित वाहतूक रहावी यासाठी मुंबईतील नागरिकांना बेस्टचा स्वतःचा ताफा वाढवून खाजगी कंत्राट देणे बंद करा अशी मागणी करण्यात आली. मागील काही वर्षात बंद केलेले किंवा कमी केलेले बस, सर्व बस मार्ग सुरू करा, सर्व बस मार्गांवर बसेसची संख्या वाढवा प्रत्येक बसमध्ये वाहक ठेवून प्रवासांचा वेळ वाचवा. मुख्य मार्गांवर बस प्राधान्य मार्गिका सुरू करा. जेणेकरून बेस्ट बसेस वेळेवर धावतील आणि त्यांना खाजगी वाहनांना वाहतूककोंडीत अडकून पडावे लागणार नाही. व्यापारीकरणाच्या नावाखाली बेस्टच्या बस आगारांच्या जमिनी विकण्यापेक्षा बेस्टच्या अर्थसंकल्पाला महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाचा भाग बनवा आणि इतर महानगरपालिका सुविधांप्रमाणेच बेस्ट चालवा, अशा असंख्य मागण्या या जन सुनावणीत घेऊन आता त्या बेस्ट प्रशासनासमोर ठेवण्यात येणार आहेत.

**- अल्पेश म्हात्रे**

## राशिभविष्य

सोमवार,२८ एप्रिल २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मीती वैशाख शुद्ध प्रतिपदा शके १९४७. चंद्र नक्षत्र भरणी. योग आयुष्यमान. चंद्र राशी मेष भारतीय सौर ८ वैशाख शके १९४७. सोमवार, दि. २८ एप्रिल २०२५. मुंबईचा सूर्योदय ६.१२, मुंबईचा चंद्रोदय ६.१६, मुंबईचा सूर्यास्त ६.५९, मुंबईचा चंद्रास्त ७.४५ , राहू काळ ७.४८ ते ९.२४, वैशाख मासारंभ, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : कार्यक्षेत्रातील आपले ठोकताळे व अंदाज अचूक ठरतील.

**वृषभ** : व्यवसायातील उलाढाल वाढेल उत्पन्नही वाढेल.

**मिथुन** : नोकरीमध्ये वरिष्ठांची अपेक्षित साथ मिळेल.

**कर्क** : प्रेमात यश मिळून सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**सिंह** : दैनंदिन कामात काटेकोरपणे नियोजन करावे.

**कन्या** : जबाबदारी अधिक परिश्रम घेऊन पार पाडावी लागेल.

**तूळ** : आपल्या कामात सातत्य व एकाग्रता पाळून कामे पूर्ण करा.

**वृश्चिक** : महत्त्वाची कामे मार्गी लावण्यात यशस्वी व्हाल.

**धनू** : काही मानसिक दडपण येण्याची शक्यता आहे.

**मकर** : प्रयत्नांना यश मिळू शकते.

**कुंभ** : उत्साहवर्धक व आनंददायी दिवस आहे.

**मीन** : कामात दिरंगाई किंवा आळस नको आजचे काम आजच करा.

## जनसंवाद

### दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

भारताला जेव्हा-जेव्हा दहशतवादाची झळ बसली तेव्हा-तेव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले. मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही, तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्त्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा सत्ता स्थापन करण्याच्या तयारीची जबाबदारी देवेंद्र फडणवीसांवर असणार आहे. तरीही देवेंद्र फडणवीस यांना भाजपा केंद्रात मोठी जबाबदारी देईल अशीही चर्चा अनेकदा होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सेवानिवृत्तीचा मुद्दा आला की फडणवीसांच्या प्रमोशनची चर्चाही होते. फडणवीसांनी या चर्चांना कधीही दुजोरा दिला नाही पण त्याचवेळी त्यांनी या चर्चांना नाकारलंही नाही. मराठी माणूस केंद्रात जाऊन पंतप्रधान होण्याची पात्रता असताना त्यांना राज्यात अडकवू नका.

– **विवेक तवटे,** कळवा

### ग्राहकांची लूट होतेय

सध्याच्या जमान्यात स्मार्टफोन जितके महत्त्वाचे आहेत तितकेच त्यातून उपलब्ध होणारे इंटरनेट देखील तितकेच महत्त्वाचे आहे. या दोन्ही सुविधांशिवाय आपली मोठीच गैरसोय होते. जर आपल्याकडे स्मार्टफोन आणि इंटरनेट नसेल, तर आपली अनेक महत्त्वाची कामे थांबतात. अशा परिस्थितीत जर फोनवर नेटवर्क नसेल तर ती एक मोठी समस्या बनते. वारंवार खंडित होणाऱ्या नेटवर्कमुळे बोलण्यात व्यत्यय येतोच शिवाय फोन डेटा वापरू शकत नाही. असाच अनुभव सध्या बीएसएनएल वापरकर्त्यांना येत आहे. मी काही कारणास्तव बीएसएनएलचे सिम कार्ड घेतले; परंतु या बीएसएनएल सिम कार्डला मुंबईत नेटवर्क मिळत नाही. बीएसएनएलवाले त्यांच्या विविध प्लॅनप्रमाणे रिचार्जचे पैसे घेतात, पण मुंबईत नेटवर्क मिळत नसल्याने त्याचा काहीच फायदा होत नाही. बीएसएनएल कस्टमर केअरला कळवावे तर तेथेही 'सारा आनंदीआनंद कारभार' असल्याने तक्रारींचे निराकरण होत नाही आणि तेथेही निराशा पदरी पडते. बीएसएनएलवाल्यांना मुंबईत नेटवर्क देता येत नसेल तर त्यांनी विविध प्लॅनप्रमाणे रिचार्जचे पैसे का घ्यावेत? म्हणजे बीएसएनएलवाल्यांकडून ग्राहकांची ही एक प्रकारे लूट नाही काय?

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### चांद्रयान मोहीम रचेते कस्तुरीरंगन

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या निधनामुळे विज्ञान आणि शैक्षणिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या नेतृत्वात चांद्रयान मोहिमांचा पाया रचला गेला होता. १९९४ ते २००३ या कालावधीत ते इस्रोचे प्रमुख होते. केवळ विज्ञान व तंत्रज्ञानापुरते त्यांचे योगदान मर्यादित नव्हते. भारताच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा तयार करणाऱ्या समितीचे ते अध्यक्ष होते. त्यांनी शालेय अभ्यासक्रमांपासून उच्चशिक्षणापर्यंत संपूर्ण शिक्षण प्रणालीत मूलभूत बदलांची शिफारस केली. विज्ञान आणि शिक्षण यामधील समन्वय त्यांचे एक वैशिष्ट्य होते. डॉ. कस्तुरीरंगन यांनी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलगुरू, राजस्थान विद्यापीठाचे कुलाधिपती, तसेच अणुऊर्जा आयोगाचे सदस्य अशा अनेक संस्थात्मक जबाबदाऱ्या पार पाडल्या. संयुक्त राष्ट्र संघाच्या अंतर्गत असलेल्या अवकाश विज्ञान आणि तंत्रज्ञान शिक्षण केंद्राच्या मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. भारताला ज्ञानाधिष्ठित महासत्ता बनवण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले होते . पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण या तिन्ही सर्वोच्च नागरी सन्मानांनी त्यांना गौरवले होते. कस्तुरीरंगन यांच्या निधनाने तरुण शास्त्रज्ञ तसेच संशोधकांसाठी देशाच्या विविध शैक्षणिक, वैज्ञानिक क्षेत्रातील मार्गदर्शक ठरणारा अष्टपैलू शास्त्रज्ञ गमावला आहे.

– **संतोष राऊत,** लोणंद जि. सातारा

### भारतीयांची सुरक्षा धोक्यात?

केंद्रात भाजपा तिसऱ्यांदा सत्तेवर आले आहे. मागील दहा वर्षांत देशांतर्गत आणि देशा बाहेरील कामकाजाचा दांडगा अनुभव आला असेल. पंतप्रधान पदावर नरेंद्र मोदी विराजमान आहेत. मागील दहा वर्षांत देशाच्या सीमारेषेवर सुरक्षा व्यवस्था अधिक शक्तीशाली होणे अभिप्रेत होते. पण तसे नसल्याचे काश्मीरमधील पहलगाम मध्ये पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना गोळ्या घालून मारले यावरून दिसून येते. आमचे संरक्षण दल, त्यांचे सल्लागार, संरक्षण मंत्री, गृहमंत्री यांना भारतीय गुप्तहेर यंत्रणेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माहिती का दिली नाही. पंतप्रधान, गृहमंत्री देशातील जनतेला उपदेश करतात त्यावर विश्वास ठेवून जीवनक्रम सुरू ठेवतात. अशा दुर्दैवी घटनांची मालिका सुरूच राहीली तर विश्वास कोणावर ठेवायचा. पुलवामा हल्ल्यांनंतरही दहशतवाद्यांच्या कुरापती सुरूच आहेत. महाराष्ट्रातील सहा पर्यटक दहशतवाद्यांकडून मारले गेले. काश्मीरमधील गोळीबारात २६ पर्यटक ठार झाले. काय दोष होता त्यांचा ते हिंदू होते म्हणूनच दहशतवाद्यांनी प्रथम पर्यटकांची नावे विचारली नंतर त्यांना गोळ्या घातल्या. बैसरन या 'मिनी स्वित्झर्लंड' अशी ओळख असलेल्या गवताळ प्रदेशात पर्यटक आनंद घेत असतानाच दहशतवादी हल्ला झाला. काश्मीरमध्ये थोड्याफार प्रमाणात शांतता प्रस्थापित होत होती. पर्यटक वाढत होते. पुढील सहा महिन्यातील १५ हजार विमान तिकीटे रद्द करण्यात आली. तेथील मूळ व्यवसाय असलेल्या पर्यटनाला मोठा धोका निर्माण झाला आहे. भारत सरकारकडून पाकिस्तानला जशास तसे उत्तर का दिले नाही.कोणाची वाट बघत आहेत. भारतीय नागरिकांचे मरण स्वस्त करू नका. भारतीय राजकारणात जेवढी जरब बसवली तेवढी जरब शत्रू राष्ट्रांवर बसवा. महाराष्ट्रातील जनतेत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

– **महादेव गोळवसकर,** कुर्ला

# विज्ञानवादीनी डॉ. नंदिनी हरिनाथ

एक लहान मुलगी आपल्या कुटुंबीयांसह रविवारी बसून स्टार ट्रेक हा काल्पनिक कार्यक्रम उत्सुकतेने पाहायची. त्या मालिकेत एक टीम स्पेसशिप व्हॉएजरमध्ये बसून ब्रह्मांडाचा शोध घेत फिरायची. वेगवेगळ्या ग्रहांवरची परिस्थिती, तिथले अनुभव, संकटं अशा गोष्टींना तोंड देत पुढे जात राहायचे हीच त्या मालिकेतील संकल्पना. याचा परिणाम म्हणून नंदिनी याबाबत उत्सुक राहिली व त्या दिशेने तिची पावले उचलली गेली.

नंदिनीचा जन्म आणि वाढ तामिळनाडूमध्ये झाली. तिची आई गणित शिक्षिका व वडील अभियंता आणि भौतिकशास्त्र प्रेमी होते. त्यामुळे तिला लहानपणापासूनच विज्ञानाची आवड निर्माण झाली.

डॉ. नंदिनी यांनी भारताच्या पहिल्या आंतरग्रहीय मोहिमेत (Mars Orbitor Mission)- मंगळयान यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. मंगळयान मोहिमेत डॉ. नंदिनी यांनी डेप्युटी ऑपरेशन्स डायरेक्टर व प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम पाहिले.

५ नोव्हेंबर २०१३ च्या एका शांत सकाळी, भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो)च्या मिशन कंट्रोल रूममध्ये, डॉ. नंदिनी हरिनाथ आपल्या टीमसोबत संगणक स्क्रीनकडे डोळे लावून बसल्या होत्या. त्यावेळी परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती. भारताच्या पहिल्या आंतरग्रहीय मोहिमेचा, मंगळयानचा प्रक्षेपण क्षण जवळ आला होता. जर सर्व काही योग्य झाले, तर भारत मंगळावर यशस्वीरीत्या पोहोचणाऱ्या देशांच्या यादीत सामील होणार होता.



ओंजळ

पल्लवी अष्टेकर

मात्र हे एक वेगळे आव्हान होते. कारण इतर देशांच्या तुलनेत भारताला हे संपूर्ण मिशन फक्त ७४ दशलक्ष डॉलर (₹ ४५० कोटी रुपये) या कमी बजेटमध्ये पूर्ण करायचे होते. अमेरिकेच्या नासाने (NASA) आणि युरोपच्या अवकाश संस्था (ESA)ने मंगळावर पोहोचण्यासाठी अत्याधुनिक आणि महागड्या तंत्रज्ञानाचा वापर केला होता, पण इस्रोकडे तेवढे मोठे बजेट नव्हते. डॉ. नंदिनी हरिनाथ यांच्यासाठी हा क्षण एक विशेष यश होते. त्यांनी इस्रोमध्ये २० वर्षांहून अधिक काळ काम केले होते आणि अनेक उपग्रह प्रक्षेपण मोहिमांमध्ये योगदान दिले होते. पण मंगळयान ही वेगळीच जबाबदारी होती. कारण ही भारताची पहिलीच आंतरग्रहीय मोहीम होती.

मंगळयान मोहिमेसमोरील सर्वात मोठे तांत्रिक आव्हान म्हणजे कमी खर्चात अंतराळयान मंगळावर पाठवणे. अमेरिका आणि युरोपसारख्या महासत्तांनी अत्यंत शक्तिशाली रॉकेट्स वापरून त्यांची याने थेट मंगळाच्या दिशेने पाठवली होती. पण भारताकडे तसे शक्य नव्हते. PSLV-C२५ (Polar Satellite Launch Vehicle) या कमी ताकदीच्या रॉकेटच्या मदतीने, मंगळयान थेट मंगळाकडे पाठवणे अशक्य होते. त्यामुळे, नंदिनी आणि त्यांच्या



टीमने स्लिंग शॉट (Gravity Assist) तंत्राचा वापर करण्याचा निर्णय घेतला. या तंत्रानुसार, मंगळयानाला थेट मंगळाकडे सोडण्याऐवजी, आधी पृथ्वीभोवती कक्षा ठरवण्यात आली. पुढील चार आठवड्यांत, इस्रोने ६ वेळा ऑर्बिट-रेझिंग (कक्षा वाढवण्याची) यशस्वी यंत्रणा राबवली, ज्यामुळे यानाची गती हळूहळू वाढत गेली. शेवटी, १ डिसेंबर २०१३ रोजी, "Trans-Martian Injection (TMI)" नावाच्या निर्णायक टप्प्यात, मंगळयानाला शेवटचा वेग वाढवणारा जोर देण्यात आला आणि ते पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणातून मुक्त झाले व मंगळाच्या दिशेने प्रवास करू लागले.

६५० दशलक्ष किलोमीटरचा हा प्रवास अत्यंत आव्हानात्मक होता. अंतराळयान ३०० दिवस मंगळाच्या दिशेने प्रवास करत होते आणि या काळात त्याची गती, दिशा आणि स्थिरता यावर बारीक लक्ष ठेवावे लागत होते. या मोहिमेतील एक मोठी अडचण म्हणजे मंगळ आणि पृथ्वी यांच्यातील अंतर. कारण अंतराळयानाला पृथ्वीवरील वैज्ञानिकांकडून दिलेले संदेश १२ मिनिटे उशिराने मिळत होते. याचा अर्थ असा की, जर काही तांत्रिक समस्या आली, तर इस्रोला तत्काळ सुधारणा करणे शक्य नव्हते. म्हणूनच, नंदिनी आणि त्यांच्या टीमने मंगळयानाला स्वयंचलित निर्णय घेण्याची क्षमता दिली.

२४ सप्टेंबर २०१४ ला अखेर तो ऐतिहासिक दिवस उजाडला. मंगळयान मंगळाच्या कक्षेत पोहोचले होते, पण यशस्वी होण्यासाठी अजून एक मोठे आव्हान उरले होते. यानाला मंगळाच्या गुरुत्वाकर्षणात प्रवेश करण्यासाठी वेग कमी करणे गरजेचे होते. जर इंजिनने पुरेशी शक्ती न वापरली असती, तर मंगळयान मंगळाच्या कक्षेत न जाता पुढे वाहून गेले असते आणि जर शक्ती जास्त वापरली असती, तर यान मंगळाच्या पृष्ठभागावर आदळले असते. यासाठी, इस्रोने यानाचे इंजिन २४ मिनिटे अखंड कार्यान्वित ठेवले, ज्यामुळे वेग कमी झाला आणि अखेर... मंगळयानाने यशस्वीपणे मंगळाच्या कक्षेत प्रवेश केला! त्याक्षणी, इस्रोच्या संपूर्ण टीमसाठी हा आनंदाचा क्षण होता. भारत हा जगातील पहिला देश ठरला, ज्याने पहिल्याच प्रयत्नात मंगळावर यश मिळवले! अमेरिकेच्या NASA, युरोपच्या ESA आणि रशियाच्या Roscosmos नंतर, भारत हा जगातील चौथा देश ठरला, ज्याने मंगळाच्या कक्षेत स्वतःचे यान पोहोचवले.

या मोहिमेच्या माध्यमातून मंगळ ग्रहाच्या वातावरणाचा आणि पृष्ठभागाचा अभ्यास करण्यासाठी पाच उपकरणे पाठविण्यात आली. मंगळयानाने मंगळ ग्रहाचे आश्चर्यकारक फोटो काढले. मिथेन वायू आणि हायड्रोजनच्या उपस्थितीचा अभ्यास केला, ज्याचा संबंध मंगळावर जीवसृष्टीच्या अस्तित्वाशी असू शकतो. मंगळावरील हवामानाच्या स्थितीचा अभ्यास केला, जो भविष्यातील मोहिमांसाठी महत्त्वाचा ठरेल.

नासा आणि अनेक आंतरराष्ट्रीय अवकाश संस्थांनी इस्रोच्या किफायतशीर तंत्रज्ञानाचे आणि अचूक नियोजनाचे कौतुक केले. या मोहिमेचे आयुष्य फक्त ६ महिने अपेक्षित होते, पण ती तब्बल ८ वर्षे कार्यरत राहिली. भारताच्या भावी आंतरग्रहीय मोहिमांसाठी ती मार्गदर्शक ठरली, जसे की मंगळयान-२ व गगनयान. या मोहिमेने भारतीय वैज्ञानिक समूहाला जागतिक स्तरावर मान मिळवून दिला.

RISAT-१ - रडार इमेजिंग सॅटालाईट-१ भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा, शेती व आपत्ती व्यवस्थापनासाठी महत्त्वाचा डेटा प्रदान करणाऱ्या मोहिमेत त्यांनी भूमिका बजावली. सध्या त्या इस्रोच्या 'टेलिमेटरी ट्रॅकिंग व कमांड नेटवर्क सेंटर'- IS-TRAC- मध्ये डेप्युटी डायरेक्टर आहेत. इस्रोच्या सर्व उपग्रहांच्या ट्रॅकिंग व नियंत्रणासाठी त्या जबाबदार आहेत.

त्या १०-१४ तास सतत मेहनत घेणाऱ्या वैज्ञानिकांपैकी एक आहेत. त्या दोन मुली व एका भाचीच्या आई आहेत. त्या युवतींना अंतराळ विज्ञानाच्या क्षेत्रात जाण्यासाठी प्रोत्साहन देतात. भारतात STEM-(Science, Technology, Engineering, Mathematics) क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाढावे यासाठी त्या कार्यरत आहेत. सरकारने "नमो ड्रोन दीदी" आणि G-२० STEM शिक्षण प्रकल्पांद्वारे महिलांसाठी संधी निर्माण करण्यावर भर दिला आहे. डॉ. नंदिनी यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

# 'माफ इसे, हर खून है...!'

बरोबर ४२ वर्षे १९ दिवसांपूर्वी एक सिनेमा आला होता. आज त्याची आठवण यावी याला कारण त्यातले एक जबरदस्त गाणे! ते आजच्या परिस्थितीला तंतोतंत लागू पडते! आनंद बक्षी एखाद्या विषयावर किती सखोल विचार करून त्यावर अंतिम वाटावी अशी रचना करत त्यांचे हे गाणे म्हणजे एक पुरावाच!

सिनेमा होता १९८३ चा 'अंधा कानून.' तसा तो एका तमिळ सिनेमाचा ('सत्तम ओरु इरुतर्राई' {१९८१}) रिमेक! कलाकार होते रजनीकांत, रीना रॉय, हेमामालिनी, धर्मेंद्र, अमिताभ बच्चन, प्राण, प्रेम चोपडा, मदन पुरी, डॅनी, अमरीश पुरी, ओम शिवपुरी, सुलोचना, असरानी, आगा आणि माधवी. त्यावर्षी सर्वाधिक उत्पन्न मिळवणाऱ्या चित्रपटात 'अंधा कानून'चा क्रमांक ५ वा होता. रजनीकांतचा तो पहिला हिंदी चित्रपट! कथा गुंतागुंतीची होती. विजय सिंगला (रजनीकांत) आपल्या पित्याच्या खुन्यांचा बदला घ्यायचा आहे. त्याच ध्येयाने विजयची बहीण दुर्गा देवी (हेमा मालिनी) पोलीस अधिकारी झालेली आहे. मुळात सज्जन आणि परोपकारी असलेल्या मात्र संतापलेल्या विजयला प्रसंगी कायदा हातात घेऊनसुद्धा मारेकऱ्यांना ठार करायचे आहे. त्याची भेट अशाच एका न्यायव्यवस्थापीडित जान निसार खानशी (अमिताभ बच्चन) होते. वनाधिकारी खान एक कर्तव्यदक्ष अधिकारी असतो. त्याच्याकडून चंदनतस्करांना पकडताना एका तस्कराचा (राम गुप्ता) मृत्यू होतो. एरव्ही अत्यंत ढिसाळपणे चालणारा खटला वेगाने चालून जान निसार खानला २० वर्षांची शिक्षा होते. तो तुरुंगात असताना त्याच्या पत्नीवर बलात्कार झाल्याने ती वैफल्यग्रस्त होऊन मुलीसह आत्महत्या करते! अमिताभला ते दुःख असह्य होते. त्याला नंतर कळते की गुप्ता चक्क जिवंत आहे. म्हणजे कायद्याच्या चुकीमुळे आपल्याला न केलेल्या गुन्ह्याबद्दलही आयुष्यातली २० वर्षे तुरुंगात काढावी लागलीत! तो, संतप्त होतो. रजनीकांत, हेमा मालिनी आणि अमिताभ एकत्र येतात आणि आपापले सूड घेतात अशी ही कथा.





सुरुवातीच्या एका प्रसंगात अभिताभ बच्चन हेमा मालिनीला गुंडांच्या तावडीतून वाचवतो आणि ती त्याचे आभार मानते. त्यावेळी ती म्हणते, 'आपका बहुत बहुत शुक्रिया. आपने कानूनकी मदद की हैं, मैं आपको इनाम दिलवाऊंगी! तिचा पोलिसी गणवेश पाहून अमिताभच्या मनातील एकंदर व्यवस्थेबद्दलचा राग वर येतो आणि तो म्हणतो, 'कानून?' इनाम? ये कानूनका नाम मेरे सामने फिर मत लेना!' आणि तो निघून जातो.

जाताना स्वतःशीच तो जे गाणे म्हणतो ते म्हणजे आनंद बक्षीजी, किशोरदा, लक्ष्मी-प्यारे आणि एडिटरने केलेली कमाल होती. आनंदजींचे भेदक शब्द होते-

**'ये अंधा कानून है, ये अंधा कानून है,**
**'जाने कहाँ दगा दे दे, जाने किसे सजा दे दे,**
**साथ न दे कमजोरोंका, ये साथी है चोरोंका,**
**बातों और दलीलोंका, ये है खेल वकिलोंका,**
**ये इंसाफ नहीं करता, किसीको माफ नहीं करता, माफ इसे हर खून है, ये अंधा कानून है...!'**

किशोरदाने 'अंधा' या शब्दाचा उच्चार लांबवत असा काही आलाप घेतला होता की, या आलापामुळे गाण्याचा अर्थ आणि गांभीर्य श्रोत्याच्या हृदयापर्यंत पोहोचते. लक्ष्मी-प्यारेंच्या अप्रतिम चालीवर किशोरदाने गाणे इतके समरसून गायले की 'अँग्री यंग मॅन' अमिताभच गातोय असे वाटते. अमिताभनेही मनात धुमसणारा राग, वैफल्य, बेफिकीरी अगदी सहज अभिनयातून दाखवली. त्याला आलेला न्यायव्यवस्थेचा वेदनादायी अनुभव, पत्नीवर अत्याचार, मुलीचा मृत्यू आणि न केलेल्या गुन्ह्याबद्दल २० वर्षांचा तुरुंगवास... सगळे बक्षीजींच्या शब्दातून लाव्हा रसासारखे बाहेर येते.एकेक वाक्य सगळ्या व्यवस्थेने चिंतन करावे असे आहे. 'साथ न दे कमजोरोंका, ये साथी है चोरोंका, बातों और दलीलोंका, ये है खेल वकीलोंका.' किती भेदक, किती खरे वर्णन! आणि शेवटचे वाक्य, तर कहर आहे, 'माफ इसे हर खून है, ये अंधा कानून है!' आपली अकार्यक्षम, भ्रष्ट व्यवस्था कितीतरी निष्पाप लोकांचे बळी घेते आणि न्यायालयाचा अवमान होण्याच्या भीतीने तिला कुणीही दोष देऊ शकत नाही हे सत्य आनंदजींनी किती सहज, एका ओळीत, सांगितले!



नॉस्टॅल्जिया

श्रीनिवास बेलसरे

गाण्याच्या वेगवान चालीमुळे दृश्यात्मकता साधणे, कवितेतील सर्व संदेश दृशातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे एक आव्हान होते! कारण ओळीमागून ओळ वेगळ्याच घटनेवर भाष्य करत जाते. तरीही एडिटरने एकही संदेश केवळ श्राव्य न राहू देता दृश्यमान केला होता. त्याचे महत्त्व लक्षात येण्यासाठी गाणे मुळातून पाहणे आणि किशोरदांच्या दमदार आवाजात ऐकणे गरजेचे आहे.

'लोग अगर इससे डरते, मुजरीम जुर्म ना करते,
ये माल लुटेरे लूट गये, रिश्वत देकर छूट गये.'

हे शब्द देशातील ७५वर्षांचे विदारक वास्तव स्पष्ट करतात. त्यानंतर लगेच येणाऱ्या -

**'असमतें लुटीं, चली गोली,**
**इसने आँख नहीं खोली,**
**काला धंधा होता रहा,**
**ये कुर्सीपर सोता रहा.'**

या ओळीतून तर कश्मीरची, बंगालची जणू आजचीच स्थिती वर्णन केली होती. तीही ४२ वर्षांपूर्वी! 'स्त्रियांची अब्रू लुटली गेली, गोळ्यांचा वर्षाव झाला पण कायदा आंधळाच राहिला!' असे कवी म्हणतो. न्यायव्यवस्थेच्या निष्क्रियतेवर इतकी कठोर टीका एखादा कवीच करू शकतो. बक्षीजी पुढे म्हणतात -

दुनियाकी इमारतका, कच्चा इक सुतून है,
ये अंधा कानून है...'

लंगडा, आंधळा कायदा हा माणसाने मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या संस्कृतीच्या इमारतीचा सगळ्यात कमजोर खांब आहे! 'त्याचे हात लांब असतात वगैरे गौरवाला' काहीही अर्थ नाही. कितीही अत्याचार दिसत असले, अन्याय सुरू असला तरी कायदा स्वतःहून कसलीच दखल घेत नाही हे कवीचे दुःख आहे. या निष्क्रियतेमुळे कितीतरी निरपराध लोक फाशीवर जातात आणि खुनी सुटून सुखाने जगतात -

**'लंबे इसके हाथ सही,**
**ताकत इसके साथ सही,**
**पर ये देख नहीं सकता, ये बिन देखे है लिखता. जेल में कितने लोग सडे, सूलीपर निर्दोष चढे,**
**मैं भी इसका मारा हूँ, पागल हूँ आवारा हूँ.**
**यारों मुझको होश नहीं, सर मेरे जुनून है,**
**ये अंधा कानून है...!'**

अशा वेळी बायबलच्या 'उपदेशक' भागातील काही ओळी आठवतात. 'गांजलेल्यांचे अश्रू गळत आहेत, पण त्यांचे सांत्वन करणारा कोणी नाही. न्यायाचे स्थान पाहावे, तर तेथे दुष्टता आहे. धर्माचे स्थान पाहावे, तर तेथे दुराचार आहे' सत्य २००० वर्षांपूर्वी सांगितलेले असो की, ४२ वर्षांपूर्वी ते सत्यच असते आणि जगाचा व्यवहार त्याच्या उफराट्या पद्धतीनेच सुरू असतो, हेच खरे!

# भारतीय संगीताचा अनमोल स्रोत, मनभावन बासरी...

भारतीय परंपरेमध्ये वाद्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक देवतेचे काही ना काही वाद्य असते. उदाहरणार्थ शंकराचे डमरू, सरस्वतीची विना आणि कृष्णाची बासरी हे तर सर्व परिचित आहेत. सर्व वाद्यांमध्ये सर्वांनाच मोहीत करतो तो बासुरीचा मधुरव. बासरी म्हटले की आठवते ती राधा कृष्णाच्या प्रेमाला साक्षी असलेली बासरी.

कुठून तरी दूरवरून बासरीचा आवाज ऐकू आला तरी तो आपले लक्ष वेधून घेतो आणि बासरीमधून निघालेले सूर थेट आपल्या हृदयाला पोहोचतात. अशी अलौकीक बासरी याविषयी मला जाणून घेण्याची उर्मी निर्माण झाली आणि इतिहासात तिच्या पाऊल खुणा शोधू लागले...

भारतीय संगीत परंपरेमध्ये बासरी या वाद्याचे एक विशेष स्थान आहे. सहज, सौम्य आणि आत्मीय आवाज देणारे हे वाद्य केवळ संगीताचे साधन न राहता, अध्यात्म, भक्ती आणि निसर्ग यांच्याशी जोडले गेले आहे. पुराणकथांपासून ते आधुनिक संगीतापर्यंत बासरीची छाप सर्वच संगीत क्षेत्रातील प्रेमींवर पडते. कृष्णाच्या बासरीपासून ते पं. हरिप्रसाद चौरसियांच्या शास्त्रीय मैफलीपर्यंत, बासरीचे रूप अनेक पिढ्यांतून बदलत गेले असले तरी त्याचे मूळ सौंदर्य आणि पारंपरिक महत्त्व आजही टिकून आहे.



ग्रामीण भागांमध्ये पूर्वी गुराखी गाईंना चारण्यासाठी रानामध्ये जायचे. संध्याकाळच्या वेळेला सूर्य मावळतीकडे ढळला की गाई-वासरांना हाकारत त्याच्यामागे चालणारा गुराखी बासरी वाजवत हिरव्या कुरणांमधून यायचा. त्या वेळेला बासरीचा मधुर स्वर सारा परिसर आणि ती सायंकाळची वेळ मंत्रमुग्ध व्हायची. त्यावेळेला प्रत्येक बासरी वाजवणाऱ्या मुलांमध्ये बाळकृष्णाचे रूप आठवल्याशिवाय राहत नसायचे. या बासुरीचा इतिहास जाणून घेऊया. बासरीचा इतिहास अतिशय जुना आहे हे आपण जाणतोच आहोत. प्राचीन भारतात याचा उल्लेख 'बंशी', 'मुरली', 'वेणू' अशा नावांनी झाला आहे. वेदांमध्ये देखील वंशीचा उल्लेख आहे. महाभारत आणि रामायण यांसारख्या महाकाव्यांतही बासरीचे वर्णन आढळते. विशेषतः भगवान श्रीकृष्ण यांच्या जीवनाशी बासरीचे अतूट नाते आहे. त्यांच्या लीलांमध्ये बासरीचा महत्त्वपूर्ण सहभाग दिसतो. बासरी ही बांबूच्या अथवा इतर पोकळ लाकडांपासून बनवलेली एक सुलभ वाद्ययंत्र आहे. तिची रचना साधी असून तोंडाजवळ एक फुंकण्याची जागा व पुढे काही सूरनिर्धारणासाठी छिद्रे असतात; परंतु या साध्या रचनेतून निर्माण होणारा स्वर खूपच आत्म्याला भिडणारा असतो.

बासरी या वाद्यामागे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व तर आहेच त्याबरोबर ती भारतीय संस्कृतीची ओळखही आहे. त्यामुळे बासरीचे स्थान फक्त एक वाद्य म्हणून न राहता कृष्ण भक्तांसाठी ते कृष्णाचे प्रेम भक्ती याचेही प्रतीक मानले जाते. बासरीच्या स्वरामध्ये आत्म्याची अर्तताही आहे. त्यामुळे बासुरीचा संबंध प्रेमाची जोडला गेलेला आहे. प्रेम व्यक्त करण्यासाठी बासुरी वाजवली जाते तेव्हा तिचे सूर वेगळे असतात आणि विरहामध्ये जेव्हा बासरी वाजवली जाते तेव्हा तिचे सूर वेगळे जाणवतात. त्यामुळे ईश्वराशी एकरूप होण्याचे सामर्थ्य बासरीच्या स्वरात असल्यामुळे त्या रूपाशी तादात्म्य पावण्याची शक्ती या वाद्यामध्ये आहे. यामुळे ती आत्म्यातून उमटणाऱ्या भक्ती भावनांना मूर्त स्वरूप देते. हे आपण अनेक ग्रंथांमधून वाचत आलो आहोत. पौराणिक ग्रंथांमध्ये असे वर्णन आहे की कृष्णाच्या बासरीच्या ध्वनीने गोप-गोपिका मंत्रमुग्ध होत असत, पशुपक्षी स्तब्ध होत आणि निसर्गदेखील त्या ध्वनीला प्रतिसाद देत असे. अशा प्रकारे बासरी ही निसर्ग आणि मानव यांच्यातील संवादाचे एक साधन ठरते.



विशेष

लता गुठे

पर्वतराज्यांमध्ये बासरीचा वापर मेंढपाळ, शेतकरी यांच्याद्वारे त्यांच्या विरंगुळ्याच्या आणि मनोरंजनाच्या साधनासाठी केला जातो. त्यामुळे बासरी हे ग्रामीण जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. आजही आदिवासी संस्कृतीमध्ये बीजाला अंकुर फुटल्यानंतर शेतकरी शेताच्या बांधावर बसून बासरी वाजवतात त्यांचं म्हणणं असं आहे की बासरीमुळे पिकांची वाढ चांगली होते आणि बिजाचे मोड कोमेजून जातात तरारून वर येतात.

भारतीय शास्त्रीय संगीतातील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. बासरी ही हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामध्ये एक अत्यंत महत्त्वाचे वाद्य आहे. विशेषतः धृपद, ख्याल आणि लाइट म्युझिकच्या सादरीकरणामध्ये बासरीचा प्रभाव खूप मोठा आहे. तिच्या सजीव, लयबद्ध आणि आत्मीय ध्वनीमुळे अनेक शास्त्रीय गायक-वादक बासरीचा उपयोग साथीच्या वाद्यासाठी करतात.

पंडित हरिप्रसाद चौरसिया यांच्यासारख्या बासरी वादकांनी बासरीला जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. त्यांनी बासरीच्या विविध प्रकारांच्या संयोगाने अनेक रचनांमध्ये नवीन प्रयोग केले आणि बासरीला सोलो वाद्य म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण करून दिली.

लहान मोठ्या अशा विविध आकारांमध्ये बासऱ्या पाहायला मिळतात. त्याचप्रमाणे बासरीचे सुरानुसार विभाजनही होते. मंद्र सप्तकातील बासरी जाड, लांब व भारी असते; मध्यम सप्तकाची बासरी थोडी लहान आणि हलकी असते; तर तार सप्तकासाठी अगदी लहान बासरी वापरली जाते. अशाप्रकारे विविध वाद्य प्रकारासाठी अशा वेगवेगळ्या बासऱ्या वापरल्या जातात. लोक संगीतामध्ये तर बासरीचे अनन्य साधारण महत्त्व आहे. भारताच्या विविध प्रांतांमध्ये म्हणजे महाराष्ट्र, राजस्थान, पंजाब, उत्तरप्रदेश अशा विविध प्रांतांमध्ये पारंपरिक लोकगीतांमध्ये बासरीचा समावेश दिसून येतो. विशेषतः महाराष्ट्रात भावगीते, लोकगीते, लावणी, गवळण अशा पारंपरिक शैलींमध्ये बासरीचा उपयोग भावनात्मकता वाढविण्यासाठी केला जातो.

बासरी आणि निसर्ग या दोन्हीचा संबंध एकरूपतेचा आहे. मुळातच बासरी ही निसर्गाच्या सान्निध्यात बासरीच्या सुरांमध्ये निसर्गाचे एक विशेष प्रतिबिंब उमटते. झुळूक वाऱ्याची सरसर, पक्ष्यांचे कूजन, नद्यांचा खळखळाट. या सर्वांचे अनुकरण बासरी सहजपणे करते.

म्हणूनच अनेक वेळा बासरी वाजवताना श्रोते निसर्गाच्या सान्निध्यात बासरी वादनाचा अनुभव घेतात. बासरी वाजवताना श्वासाची गती, शरीराची हालचाल आणि वातावरण यांचा सुसंवाद साधला जातो. बासरीचा उपयोग चित्रपट संगीत, फ्युजन, वर्ल्ड म्युझिक, मेडिटेशन ट्रॅक्समध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. विविध आधुनिक वाद्यांच्या साथीने बासरीला नव्या साजाने सजवले जाते आणि तिच्या सौंदर्याला नवीन अर्थ प्राप्त होतो.

बासरीच्या स्वरामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याची शक्ती आहे. म्हणून बासरी हे फक्त एक संगीत वाद्य नसून तिच्यामध्ये एक मनाला आनंद, शांती देणारी आध्यात्मिक शक्ती आहे. भारतीय संस्कृतीचा सांस्कृतिक वारसा आहे. तिच्या सुरांत भक्ती आहे, सौंदर्य आहे, प्रेम आहे. ती मानवाच्या अंतर्मनाशी संवाद साधते. पारंपरिक महत्त्व असलेली बासरी आजही तिचं स्थान टिकवून आहे. एकही संगीत प्रेमी असा नसेल की त्याला बासरीचे स्वर आवडत नाहीत.भारतीय संगीत परंपरेत बासरीचे अनमोल स्थान आहे. मनाला सदैव ताजेतवाने ठेवण्याचे काम बासरी करते. बासरीचे महत्त्व समजून घेऊन, तिच्या सुरांच्या गंधाने आपले जीवन अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न प्रत्येक संगीतप्रेमीने करायला हवा.



# चोर वाटमाऱ्यांकडून अर्जुन पराभूत

प्रभास तीर्थावर यादवांच्या आपसात झालेल्या क्षुल्लक वादातून उद्भवलेल्या भांडणात कृष्ण व बलराम वगळता उपस्थित सर्व यादव ठार झाले. बलराम सुद्धा नश्वर शरीर त्यागून सर्परूपात समुद्र माध्यमातून निजधामास गेले. तेव्हा कृष्णाने सारथी दारूकाला हस्तीनापूरला जाऊन अर्जुनाला येथे येऊन, उग्रसेन व वसुदेवासह सर्वांना इंद्रप्रस्थाला नेण्यास सांग. कारण माझ्यानंतर समुद्र ही सर्व भूमी परत घेईल असे सांगून दारूकाला रवाना केले.

निरोपाप्रमाणे अर्जुन द्वारकेला आला. सर्वांच्या देहावर अंत्यसंस्कार करून सर्व जनतेला घेऊन हस्तीनापुरासाठी प्रस्थान केले. एवढा मोठा समुदाय केवळ अर्जुनाच्या आश्रयाखाली मार्गस्थ असलेला पाहून वाटेत लुटारू व वाटमारी करणाऱ्यांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. अर्जुनाने सर्वांना मरणाची भीती देऊन असे न करण्यास बजावले. मात्र त्याचा कोणताही परिणाम त्या चोरांवर न होता त्यांनी सामान, मौल्यवान वस्तू, दागिने एवढेच नव्हे, तर स्त्रियांनाही पळविण्यास सुरुवात केली. तेव्हा अर्जुनाने त्यांच्यावर शरसंधान केले. मात्र त्याला कोणताही मंत्र आठवला नाही अथवा त्याच्या बाणांचा लुटारूंवर कोणताही परिणाम झाला नाही.

उलट अर्जुनाजवळचे सर्व बाण संपून गेल्याने तो केवळ बघण्या व्यतिरिक्त काहीही करू शकला नाही. चोर अर्जुनाचा उपहास करून लूट व मदतीसाठी किंचाळणाऱ्या अनेक स्त्रियांना घेऊन पळून गेले. महाभारताच्या युद्धात मोठमोठ्या योद्ध्यांना पराभूत करणारा अर्जुन आज साध्या चोर व वाटमाऱ्यांसमोर असहाय्य झाला होता. तेव्हा त्याच्या लक्षात आले की तोच अर्जुन, तेच बाण, तेच धनुष्य, पण आज कृष्णाशिवाय सर्व निष्प्रभ ठरले. याचाच अर्थ अर्जुनाचा पूर्वीचा पराक्रम हा केवळ कृष्णाच्या सान्निध्यामुळेच होता. खजील झालेला अर्जुन इंद्रप्रस्थास पोहोचला व वनात महर्षी व्यासांची भेट घेण्यास गेला. व्यासांना नमन करून तो मूकपणे उभा राहिला. हताश दिसणाऱ्या अर्जुनाला पाहून व्यासांनी त्याला त्याच्या उदासीनतेचे कारण विचारले. अर्जुनाने घडलेला सर्व वृत्तांत कथन केला. युद्धात एवढा पराक्रम करणारा अर्जुन आज साध्या चोर दरोडेखोरांसमोर हरला व माझ्यासमोर त्या चोरांनी स्त्रियांना पळवून नेले व मी केवळ बघण्यापलीकडे काहीही करू शकलो नाही या घटनेने मला माझीच लाज वाटू लागली आहे. माझा पराक्रम हा केवळ कृष्णाच्या सानिध्यामुळेच होता. तो नसल्यामुळे मी एक अतिसामान्य व्यक्ती आहे. असे म्हणून शोकमग्न झाला.

महाभारतातील मोतीकण

भालचंद्र ठोंबरे

तेव्हा व्यास म्हणाले, हे अर्जुना! जे काही घडते ते केवळ परमात्म्याच्या इच्छेनेच घडते. सर्व घटनांचा करता करविता कृष्णच असून कालचा तुझा पराक्रम व आजचा तुझा साध्या चोर वाटमाऱ्यांद्वारे झालेला पराभव हे सर्व त्याच्याच इच्छेने झालेले आहे. त्यामुळे व्यर्थ शोक करू नको. पृथ्वीवर झालेला दुर्जनांचा भार कमी करण्यासाठी त्याने मृत्यूलोकात जन्म घेतला व आता इच्छित कार्य पूर्ण होताच आपल्या निजधामास प्रयाण केले. हा सर्व या ईश्वरी खेळाचाच भाग आहे.

एकेकाळी देवांनी राक्षसावर मिळविलेल्या विजयाचा आनंद सुमेरू पर्वतावर साजरा करण्यात येत होता. त्यात भाग घेण्यासाठी हजारो अप्सरा जात असताना त्यांना वाटेत अष्टावक्र ऋषी पाण्यात केवळ डोके वर ठेवून तपश्चर्या करीत असल्याचे दिसले. अप्सरांनी त्यांची स्तुती केली. त्या स्तुतीने प्रसन्न होऊन ऋषींनी त्यांना त्यांची मनोकामना विचारली. तेव्हा रंभा व तिलोत्तमा वगळता बाकी सर्व अप्सरांनी कृष्ण पती रूपाने मिळावा, अशी इच्छा प्रगट केली.

मुनींनी तथास्तू म्हटले. आता ऋषी पाण्यातून उठून बाहेर आले. त्यांचे अनेक ठिकाणी वाकलेले शरीर पाहून अप्सरा हसू लागल्या. तेव्हा क्रोधीत झालेल्या ऋषींनी तुम्हाला जरी कृष्ण पती म्हणून लाभला, तरी चोर व लुटारू तुम्हाला पळवून नेतील असा शाप दिला. ते ऐकून अप्सरांनी ऋषींची क्षमा मागितली, तेव्हा तुम्ही परत स्वर्गात जाल असा उःशाप दिला. त्यामुळे त्यांच्याबद्दल व्यर्थ चिंता सोड. त्या सर्व अप्सरा होत्या व त्या सर्व स्वर्गलोकी पोहोचल्या आहेत.

हे सर्व प्रभूच्या इच्छेने घडले व घडते आहे. तेव्हा आता तुम्ही पाचही जण राज्यकारभाराचा त्याग करून वनप्रस्थानास जावे, असा सल्ला व्यासांनी अर्जुनाला दिला. व्यासांच्या सल्ल्याप्रमाणे परीक्षिताला राज्याभिषेक करून पाचही पांडव द्रौपदीसह स्वर्गरोहणासाठी प्रस्थान झाले. हे श्रीकृष्णाचे पावन चरित्र नित्य श्रवण आणि मनन केल्याने माणूस दोषरहित होतो आणि वैकुंठ लोकी जातो असे विष्णूपुराणात कथन केले आहे.

# भारतीयांना लोकशाही बहाल केली

## पप्पू कागदे

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशभर होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारून शोषत, पिडीत उपेक्षीत समाज बांधवांना मुख्य प्रकलत आणण्यासाठी त्याचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मीती करून प्रत्येकांना स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला.

हजारो वर्षांची गुलामगीरी नष्ट करून उपेक्षीतांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला देवून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती प्रसंगी, शिवणी, खांडवी, सांडरवण, घाटजवळा, आहेर वडगांव या गांवी केले.

पुढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महीलांचे सक्षमीकरण-करण्यासाठी हिंदु कोड बील मंजूर करून त्यांना त्याचे हक्क व अधिकार दिले. आणि अशिक्षीत समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण मोफत व सक्तीचे करुन शिक्षणाची दारे खुली केली.

एक व्यक्ती एक मताचा अधिकार देवून मतदारराजा बनविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता भारताला संविधान देवून सक्षम लोकशाही बहाल केली.

यावेळ पूज्य भिख्कु धम्मशिल थेरो, राजू जोगदंड, किशोर कांडेकर, किसन तांगडे, सुभाष तांगडे, अण्णा भोले, किशोर भोले, शुभम भोले, विजय डोळस, नवनाथ डोळस, विजय सुपेकर, गोरख डोळस, राहुल कांबळे, सुनिल कांबळे, विभीषण जावळे, बंडू घुमरे, सुनिल गायकवाड,प्रमोद गायकवाड यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

# ...तर महिला शिकल्या असत्या का?

## जयंती:फुलें दाम्पत्याची रथातून मिरवणूक



पुण्यभूमी प्रतिनिधी

दिंद्रुड:माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात काल शनिवारी (२६ एप्रिल) साजरा करण्यात आला. फुलें दाम्पत्याची पंचरंगी घोड्याच्या रथातून अख्ख्या नगरीतून जंगी मिरवणूक काढण्यात आली. 'फुले सावित्री नसती तर, मुलगी शिकली असती का...' अशा अनेक गाण्यांवर गावातील तरुणाई बेधुंद होत थिरकली.

येथील मोहखेड चौकात भव्य पंचघोड्याच्या सजवलेल्या रथात स्थापन केलेल्या महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याचे पुष्पहार, पूजन करून मिरवणुकीला सुरुवात झाली. अवघ्या दिंद्रुड नगरीत जंगी मिरवणूक पार पडली. गावभर मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात महापुरुषांच्या अनेक गाण्यांवर ठेका धरत तरुणांनी जयंतीचा आनंद लुटला. यामध्ये 'फुले सावित्री नसती तर, मुलगी शिकली असती का...' 'चमके शिवबाची तलवार...' 'जगात गाजावाजा, भिमराव एकच राजा...' 'ये भगवा रंग...' दरारा दरारा महात्मा फुलेंचा...' अशा अनेक गाण्यांवर वाजतगाजत नाचत चिमुकल्यांपासून ते मोठ्यापर्यंत सर्वांनीच मिरवणुकीत पान २ वर

# पंकजा मुंडेंनी स्विकारलं पालकत्व

## दया:'प्रिती अन् रोझी'च्या गृहप्रवेशाचं स्वागत

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची संवेदनाशीलता सर्व परिचित आहे. त्याचबरोबर त्यांचे श्वानप्रेमही सर्वांना ज्ञात आहे.एक व्यासंगी, परखड वक्ता, अभ्यासू खंबीर लोकनेता अशी प्रतिमा असलेल्या पंकजाताई मुंडे यांच्या अतिशय संवेदनाशील व मातृवत वात्सल्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाची अनुभूती अनेकवेळा येते.असाच काहीसा प्रसंग काल बघायला मिळाला. या प्रसंगातून व्यक्ती म्हणून पंकजाताईंचा प्राणीमात्रांबद्दलचा जिव्हाळा अन् पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई म्हणून पशुधनांविषयीचे त्यांचे मातृवत 'वात्सल्य' समोर आले आहे.



कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी स्वतःच्या घरी लेकरं सांभाळावे या पद्धतीने आठ श्वानांच्या पिलांचा सांभाळ केलेला होता.यापैकी दोन पिलं त्यांनी पंकजाताई मुंडे यांना देवू केली.श्वानप्रेमी असलेल्या पंकजाताई व त्यांचा सुपूत्र आर्यमान यांना अतिशय आनंद झाला.या नविन दोन श्वानांच्या आगनमनाचा उत्साह व उत्सुकता त्यांना लागलेली होती. अतिशय भावनिकतेने व जिव्हाळ्याने कोल्हापूर येथील श्वानपालक सोनाली शिंदे यांनी या पिलांचा सांभाळ केलेला होता. त्यांनाही या पिलांचा विरह सहन होणारा नव्हता. त्यामुळे सर्व प्रकारची काळजी घेत कोल्हापूरहून मुंबई पर्यंतचा प्रवास करत शिंदे कुटुंब ही पिले घेऊन आली. पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी या पिलांना आणण्यात आले यावेळी सोनाली शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांचे पंकजाताईंनी कृतज्ञतापूर्वक अतिशय प्रेमाने स्वागत केले. त्याचबरोबर त्यांनी आणलेल्या रोजी आणि प्रिती या दोन श्वान पिलांचे मातृवत स्वागत केले. आपल्या कुटुंबात नव्या सदस्यांचे स्वागत करावे असा अतिशय उत्साहात प्रिती आणि रोझीच्या गृहप्रवेशाचा एक छोटेखानी आनंदी सोहळा यावेळी साजरा करण्यात आला. पंकजाताई मुंडे यांनी हळद कुंकू लावून त्यांचं आत्मीय स्वागत केलं. मुक्या प्राण्यांनाही आत्मिय ओढ असते आणि विरहाची पण संवेदना असते. हे या एकाच अतिशय भावनिक प्रसंगात दिसून आले. कोल्हापूरच्या मोकळ्या वातावरणात जडणघडण झालेली व राहिलेली ही पिले मुंबईच्या वातावरणात कशी राहतील असा प्रश्न सर्वांनाच पडलेला असताना मात्र पंकजाताई मुंडे यांच्या जिव्हाळ्याने ही पिले त्यांना लगेचच बीलगल्याचे दिसून आले. शिंदे कुटुंबीय या पिलांना सोडून गेल्यानंतर या पिलांना सुरक्षित वाटावे यासाठी स्वतः पंकजाताई मुंडे व त्यांचा मुलगा आर्यमान यांनी या पिलांना बराच वेळ पान २ वर

# परळी-गंगाखेड महामार्गाचे रखडले

## ॲड.मनोज संकाये:प्रशासनास दिले निवेदन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:उपजिल्हाधिकारी यांना मित्र मंडळाच्या वतीने निवेदन सादर; अन्यथा राष्ट्रीय महामार्गावर महाराष्ट्र दिनी धरणे आंदोलन करण्याचा इशारा! परळी वैजनाथ प्रतिनिधी

गेल्या तीन वर्षापासून परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आज तागायत पूर्ण झाले नसून याला जबाबदार राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित गुत्तेदार आणि अधिकारी हे जबाबदार आहेत याचा फटका प्रवाशांना बसत आहे. वाहतूक कोंडी निर्माण होऊन या मार्गावर अनेक अपघाताच्या घटना घडल्या आहेत त्यामुळे या महामार्गाचे रखडलेले काम त्वरित पूर्ण करा तसेच परळीतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावरील वळणावरची संरक्षण भिंत त्वरित बांधा या मागणीसाठी मित्र मंडळाच्या वतीने परळी येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी माननीय लाटकर साहेब यांना निवेदन दिले. यात त्यांनी विविध मागण्या केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास महाराष्ट्र दिनी परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गावर मित्र मंडळाच्या वतीने धरणे आंदोलन केले जातील असा इशारा त्यांनी दिला.




निवेदनात म्हटले आहे की, परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्ग याचे काम संबंधित गुत्तेदाराकडून सुरू असून ते आज पर्यंत अपूर्ण आहे. संबंधित गुत्तेदार अतिशय निष्काळजी पणाने या मार्गाचे काम करत आहेत. औष्णिक विद्युत केंद्राचे जुने भांडार ते धर्मापुरी फाट्यापर्यंत पुलाचे आणि मार्गाचे काम अर्धवट रखडलेले आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी निर्माण होऊन असंख्य अपघात घडण्याचा धोका निर्माण झाला आहे आणि याच ठिकाणी अपघात घडले आहेत त्यामुळे प्रवाशांना आणि वाहनधारकांना स्वतःचा जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्याचबरोबर परळी शहरातील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी उडान पुलावरील वळणावर संरक्षण भिंत पडल्याने तेथे दोघांचा मृत्यू झाल्याची घटना गेल्या दोन ते तीन महिन्यापूर्वी घडली आहे याबाबत अधिकाऱ्यांची संपर्क साधला असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळत नाही. संरक्षण भिंत पडल्याने तीस ते चाळीस फूट वाहन खाली कोसळण्याची दाट शक्यता आहे त्याचबरोबर परळी राष्ट्रीय महामार्गावरील चेंबरी विश्रामगृहा जवळील पुलावरील झाडे झुडपे, मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहेत त्यामुळे वळणावर समोरचे वाहन दिसत नाही तेथेही अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे त्यामुळे तेथील झाडे झुडपे तोडून घ्यावीत त्याच ठिकाणी रोलिंग व कठडे पडल्याने अपघात होत आहेत जवळपास ५० फूट रोलिंग नसल्याने वाहनांना धोका निर्माण झाला आहे. सदरील निवेदनाच्या पान २ वर

# महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त स्पर्धा

## अभिवादन:स्पर्धेला मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:गुरलिंग स्वामी मंदिर बेलवाडी येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व पूजन करून चित्रकला स्पर्धा व वकृत्व स्पर्धे चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती गुरुलिंग स्वामी मंदिर अध्यक्ष श्री दत्तापा ईटके गुरुजी, भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष सौ उमाताई समशेट्टी, ज्येष्ठ पत्रकारआत्मलिंगआप्पा शेटे, पत्रकार संतोष जुजगर, चंद्रकांतआप्पा समशेटी, विकास प्रतिष्ठानचे सचिव सुधीर फुलारी सर, ड.गिरीश चौधरी, वैद्यनाथ बँक संचालक महेश निर्मळे, माजी नगरसेवक महादेव ईटके वीरशिव विकास प्रतिष्ठान अध्यक्ष श्याम पान २ वर

# वर्गमित्रांची भरली पून्हा शाळा!

## ऋणानुबंध:तब्बल २८ वर्षांनी मित्र-मैत्रिणीची भेट

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील जि ,प,परिषद शाळा, व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा या शाळेत दहावी व बारावी शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी तथा वर्ग मित्र यांनी सन १९९७ च्या एस. एस .सी .बॅचचा भव्य स्नेहमिलन दिं.२७/४/२०२५ रोजी लक्की लॉन्स येथे सोहळा आयोजित करण्यात आला होता जि,प, मा, शाळा तलवाडा जयभवानी माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे शिक्षण घेतलेल्या सन १९९७साली ड.ड.उ. झालेल्यासर्व माजी विद्यार्थ्यांचा भव्य स्नेह मिलन मेळावा लक्की लॉन्स तलवाडा येथे उत्साहातपार पडला .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य पटेल, तर प्रमुख अतिथी सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी बन सर , मुख्याध्यापक विजय डोंगरे ,प्राचार्य अरूण हाटकर, व त्याकाळी अध्यापन करणारे प्रा.सोलाट , वारे सर,, बोर्डे सर , राऊत सर , बांगर सर ,बांगर मॅडम ,भवार सर उपस्थित होते. विविध ठिकाणी व विविध क्षेत्रात कार्यरत असणारे अनेक मुले व मुली तब्बल २८ वर्षानंतर एकत्र आले .ऐकमेकांना परिचय देत सर्व जुन्या आठवणीना उजाळा दिला . दुर्दे वाने अकाली सोडून गेलेले वर्गमित्र गणेश बांगर , नामदेव मराठे , शिवाजी यादव , बंडु हात्ते , प्रशांत मदुरे यांना सर्वांनी श्रद्धांजली वाहिली. या कार्यक्रमात महेश शेटे यांनी माझी विद्यार्थ्याचे छोटे छोटे खेळ घेतले त्या नंतर स्नेहभोजन याने वातावरण हलके फुलके झाले . अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करतंना गुरुजनांप्रति आदरभावव्यक्त करत बालपणी च्या आठवणींना उजाळा दिला. बनसर , बोर्डेसर , पटेल सर यांनी जिवनात कधीही नाउमेद न पान २ वर




# काळेगावमध्ये चक्क दुकानात दारु?

## मागणी:प्रशासनाने तातडीने कारवाई

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील चिंचोली माळीच्या पाठोपाठ काळेगाव मध्ये पन अवैध दारू विक्री करण्यात येत आहे त्यामुळे गावातील नागरिक त्रस्त झाले आहेत कारण आजपर्यंत चिंचोली माळी येथे तसेच इतर ठिकाणी धाब्यावर दारु विक्री करण्यात यायची परंतु काळेगाव घाट मध्ये दुकानात दारु विक्री करण्यात येत आहे यांचे नवल वाटत आहे परंतु केज पोलीस प्रशासनाने अशा दुकानावर तातडीने कारवाई करण्यात यावी असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण दुकानाला लहान मुले जातात तेव्हा अशा दुकानात दारु विक्री केली जात असेल तर लहान मुले नक्कीच वेसनाधीन झाल्याशिवाय राहणार



नाहीत तसेच दुकानात दारु विक्री केली जाते परंतु खुलेआम केली जाते तरी काळेगाव घाट येथील अवैध दारू विक्री करणाऱ्या दुकानावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## भिक्खु धम्मशिल थेरो

## नाव नोंदणी करण्याचे आवाहन

# दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पंधरा वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा. असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



### यांना नोंदणीसाठी संपर्क

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# कन्हेरवाडी शाळेचे विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र

## अभिनंदनिय: झेडपी शाळेच्या यशाची परंपरा



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:तालुक्यातील कन्हेरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या शाळेचे दोन विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र झाले असुन इ ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेतही या शाळेचे घवघवीत यश मिळविले आहे. सिद्धी सुंदर जगताप - २५८,यशराज परमेश्वर वाघमोडे - २०८,साक्षी लक्ष्मण जाधव - १९८,शिवराज विवेकानंद मिटकरी - १६०,कृष्णा गोरख साळुंके - १५२,आरोही शिवाजी कवडे - १४४,आदर्श प्रशांत शिंदे - १४२,स्वराज गणेश कवडे - १४२,धीरज नारायण गायकवाड - १४०, पान २ वर